# प्रीतसुधा

(कवितासंग्रह)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका)

मंजुभारती प्रकाशन

**प्रीतसुधा** (कवितासंग्रह)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
E-mail : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : पौष कृ. ८, शके १९४४,
रविवार, दि. १५ जानेवारी, २०२३

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
मो. ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : **978-81-953257-2-6**

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १६०/-**

# अर्पणपत्रिका



ज्या प्रेमळ मनात आपल्या प्रेयसीविषयी, पत्नीविषयी अथवा आवडत्या ललनेविषयी प्रीतीचे दृढभाव आविर्भूत होतात, ते जपले जातात आणि जीवापाड प्रीतीच्या खुणा जपल्या जातात त्या सर्व प्रेमवीरांना ही 'प्रीतसुधा' समर्पित.

# प्राक्कथन

कवीला लाभलेली प्रतिभा म्हणजे त्याची सर्वात मौल्यवान संपत्ती असते, असे मी मानते. देवी सरस्वतीच्या कृपेने आजतागायत हजारो काव्यरचना होत गेल्या; पण पुस्तक रूपाने त्या सर्व याव्यात ही माझ्या मातापित्यांची तीव्र इच्छा आहे. यापूर्वी 'भावमंजूषा' हा माझा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झालेला असून त्यानंतर दोन 'ऑडिओ बुक'देखील रसिकांना अतिशय आवडलेले आहेत.

निसर्गकविता, प्रेमकविता, भक्तिरसकाव्य, जीवनपर काव्य, बालगीतं, विरहकाव्य, ग्रामीण बाजाच्या कविता, स्त्रीजीवनपर कविता अशा नानाविध प्रकारात आतापर्यंत हजारो कविता माझ्याकडून ज्या रचल्या गेल्या आहेत त्या माझ्या मनातील स्पंदनांचे आलेख तर आहेतच; पण रसिकहृदयाची भाषाही झालेल्या आहेत. त्यांच्या अव्यक्त भावनांचे हुबेहूब प्रकटीकरण माझ्या कवितेत झाल्याच्या रसिक पाठकांच्या प्रतिक्रिया निरंतर प्राप्त होत असतात.

माझ्या जीवनाचे साहित्यिक व्रत म्हणून कित्येक वर्षांपासून दररोज किमान एक मराठी कविता लिहिली जातेय आणि ती दररोज हजारो वाचकांपर्यंत पोचतेही. 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये माझ्या नावे 'वर्ल्ड रेकॉर्ड' अर्थात जागतिक कीर्तीमानही प्रस्थापित आहे. 'प्रीतसुधा'या काव्यसंग्रहातून 'त्या'च्या मनातील तिच्या भावना शब्दचित्रातून, चित्रकाव्यातून चितारल्या गेलेल्या आहेत. वाचकांच्या हाती ही प्रीतसुधा देताना मला खरोखर समाधान होत आहे.

वाचकांच्या प्रीतीला या रचना पात्र व्हाव्यात हीच रसिकचरणी प्रार्थना !

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


१) तुझा दिलार ... ९
२) भाग्य आणिक संपदा ... १०
३) या डोळ्यांना सांग एकदा ... ११
४) हा चेहरा मज ... १२
५) नजर कातिलाना ... १३
६) असा बंदी झालो ... १४
७) तुला पाहुनी ... १६
८) फूल गुलाब मी व्हावे ... १७
९) तुझ्या पावलांचे ... १८
१०) प्रिये तुझाच राहणार ... १९
११) हात तुझा हा हाती ... २०
१२) तुला पाहता ... २१
१३) डोळ्यात हासणे हे ... २२
१४) बंदी मी या डोळ्यांचा ... २३
१५) चेहरा तुझा ... २४
१६) मुखचंद्राला ... २५
१७) दृष्टी करारी ... २६
१८) तू सुंदर की ... २८
१९) प्रीत ऋतू ... २९
२०) का ओढ असते अशी ... ३०
२१) का अशी तू उदास राणी ... ३१
२२) संजीवनी मज जीवनी ... ३२
२३) प्रीतवर्षा मजवरी ... ३३
२४) चांद अंबरात ... ३४
२५) गजरा बहु प्रीतीचा ... ३५
२६) बकुळी माझ्या मनातील ... ३६
२७) ती पाठमोरी ... ३७
२८) आयुष्याचे सुंदर गाणे ... ३८
२९) कमनीय कामिनी ... ३९
३०) रुसणे तुझे ... ४०
३१) पालवी नव उमलुनी ... ४१
३२) प्रसन्न आभा ... ४२
३३) लक्ष्मीपद ह्रदयी ... ४३
३४) ओल्या धुतल्या केसांना ... ४४
३५) सांज म्हणे वेडी ... ४५
३६) या फुलांना सांग ना तू ... ४६
३७) तू गुलाबी गंधवेडी ... ४७
३८) पाहून मोगरीच्या ... ४८
३९) हातात हात राणी ... ४९
४०) सुगंधी सुरंगी ... ५०
४१) दोषी सखये मोगरा ... ५१
४२) एकदाच मज आपुला म्हणशील ... ५२
४३) तुजवर आजही भुलला ग ... ५३
४४) स्मृती देखण्या या ... ५४
४५) परिमळ सुवर्ण चाफी ... ५५
४६) चेहरा की भाग्य माझे ... ५६
४७) पावसाळी ही पहाट ... ५७
४८) अन् हा ऋतू मोहरला ... ५८
४९) सहवासाचा सुगंध बकुळी ... ५९

५०) कसा विसरू मी तुला प्रिये ग. ६०
५१) म्हणून जीव वेडा
तुझ्या त्या अदांनी ... ६१
५२) तुझा गंध माझ्या गे
श्वासी उरावा ... ६२
५३) गूज आपुले पाऊस होणे ... ६३
५४) झुळूक बनुनी वाहतो ... ६४
५५) जर तू आली असती जीवनी. ६५
५६) अशी गावची छोरी गोरी ... ६६
५७) माझा म्हण गे मजला ... ६७
५८) घोट सुधेचे ... ६८
५९) किती प्रसन्न ... ६९
६०) शेजारीण सौंदर्यवती ... ७०
६१) तू किती खास ... ७२
६२) दोन पाकळ्या ... ७३
६३) मदनबाण तव ... ७४
६४) तू स्वप्न की ... ७५
६५) होत ओढणी ... ७६
६६) जिंकलो मी जिंकलो ... ७७
६७) रूसलीस ना ... ७८
६८) प्रेमजल ... ७९
६९) स्मृतीपारणे ... ८०
७०) अशी रूपगोडी ... ८१
७१) जाणणे सोपे ... ८२
७२) तू ये ना एकदा सखी ... ८३
७३) मनभाविनी ... ८४
७४) निरखून पाहणे तुज ... ८५
७५) येतेस सांग केव्हा ... ८६
७६) मिळताच वेळ थोडा ... ८७
७७) त्या तिच्या शब्दात ... ८८
७८) सांडले हास्यात मोती ... ८९
७९) आत्मिक प्रेम माझे ... ९०
८०) गुलबक्षी रंग हा हसतो ... ९१
८१) बाहुपाशी ये जराशी ... ९२
८२) हे सूर्यबिंब की ... ९३
८३) तू मराठमोळी ... ९४
८४) मी न राहिलो माझा ... ९६
८५) प्रेम सुंदरसा गुन्हा ... ९७
८६) राहीन तुझा केवळ ... ९८
८७) वेळीच व्यक्त व्हावे ... ९९
८८) भेट ठरू दे भावमल्मली ...१००
८९) प्रेमाचं सुरवंट ...१०१
९०) का करीशी प्रीत इतुकी ...१०२
९१) बट हळवी नखरेल ...१०३
९२) हसतेस किती गं गोड ...१०४
९३) वेलीजवळी वेल ...१०५
९४) मौनवस्त्र ...१०६
९५) भेटतेस मला अशी ...१०७
९६) रुणुझुणु पैंजण नाद मनी ...१०८
९७) पाऊसवेडी तूही ...१०९
९८) ही ओढ वेगळी ...११०
९९) नजरेत तुझ्या जे आहे ...१११
१००) दर्पणाची काय कथा ी..११२



## (१) तुझा दिलार

तू अशा अदांनी सहज चालते
काळ परी मज थांबवतो
तुला पाहू की त्या सौंदर्या
मनातच मी भांबवतो

तुझा चेहरा लावण्याची
खनी होऊनि दमकत राही
एक चांदवा लखलखणारा
मुखाभोवती चमकत राही

त्या तेजाने आधीच घायाळ
चांदण्यात मी हरखून जातो
तेवढ्यात तू नेत्रामधुनी
तीर सोडता पुरता हरतो

असा वळवीशी मधेच मुखडा
पुण्य जणू ते फळास येते
तिरकी मान नि भुवई कमान
भोवळ माझ्या दिलास येते

नाजूक हातांच्याही करशी तू
कितीतरी त्या खाणाखुणा
असा नजारा पाहण्यास मी
रोज पाठी तव चाळा देखणा

सुंदर साडी चंद्रकळा ती
मोती नक्षत्रांचे वरती
गळ्यात माला दमदमणारी
कर्णफुले ही चमचमणारी


असा अंबाडा केसांचाही
जाळीत त्या अडकून मी जातो
बाहेर नाही पडण्या इच्छा
दैवी सुरभी हुंगत जातो

रुणझुण करती पायी पैंजणे
तुझ्या चालीवर किती फिदा
मधेच साडी काठ अडकला
वाटून उचलीशी चरण जरा

एक पाय मग तोलून तुजला
सार्थक करतो स्वत:ला
तन्वी हलकीफुलकी इतुकी
सांगत असतो तो मजला

ज्या पदाला किंचित उचलून
सोडविशी तू वस्त्र किनार
अडकून पडला तिथे जो धागा
मीच आहे तो तुझा दिलार

दि.१६/०५/२०२०
रात्री ८.४८ वा.



## (२)
## भाग्य आणिक संपदा

तू असे खांद्यावरी
शिर टेकवून झुकतेस ना
विसावून जातेस की
विसंबून असतेस ना

ही तुझी छोटी कृती मज
गौरवाला नेतसे
तुज पेलण्याला मी समर्थ
तू मला सांगतसे

काहीही ना बोलते तू
श्वास मजसी बोलती
गोड ते आपुल्यातले
क्षण क्षणभरी रेंगाळती

मिटुनी तू नेत्रास दोन्ही
मजसी आतून पाहसी
मी तुला निरखून घेतो
रुधिरी तू मज वाहसी

स्वप्न कसले विणशी माहीत
नाही मजला तू क्षणी
सम्राट करशी मुकुट प्रेमे
चढविशी तू मज शिरी

मी फुलून येतो गं आतून
आश्वस्त तुजला पाहुनी
भाग्यवान मी मानतो मज
सारखे राहुराहुनी

हे तुझे नित प्रेम माझे
भाग्य आणिक संपदा
तूच निधी लावण्यदायी
तूच यशदा हो सदा

दि.१७/०५/२०२०
रात्री ९.५३ वा.



## (३)
## या डोळ्यांना सांग एकदा

कुठे शोधू मी या डोळ्यांना
मनात जाऊन बसले गं
आजही गर्दीतून शोधतो
रसिक वेडा मी तुलाच गं

क्षणात गहिऱ्या खोल त्या नयनी
बुडून गेलो आकंठ
अजूनही मी तिथेच आहे
फुलवी पिसारा मन नीलकंठ

काय रेखिले नेत्र देखणे
सृष्टी देखून घेण्याला
तो निर्माता त्यात बुडाला
विसरून त्यातच स्वत:ला

कमलदलांच्या आकारासम
सुंदर रचना नयनभूषिनी
शिडकावा नयनामृत करशील
तू तर तप्त दाहक ग्रीष्मी

या डोळ्यांच्या कज्जल सीमा
अजूनच प्रिये जीवघेण्या
नजर ना लागो म्हणून रेखीशी
मी बंदी सीमेतून होण्या

नयनचंद्रिका पडे चांदणे
पदोपदी या प्रीतीचे
मी गं शोधत फिरतो वेडा
गाव नजरेच्या रीतीचे

केवळ दिसले नयनप्रसादिनी
प्रसन्न मजसी बाण तुझे
अजून मुखचंद्राच्या प्रतीक्षे
किती सांग मी तळमळणे

या नयनांतून कधी न वाहो
जलधारा तव दु:खाच्या
रम्य स्वप्न तव पूर्ण करीन मी
प्रांती नेईन फक्त सुखाच्या

या डोळ्यांना सांग एकदा
एकदाच मज बघण्याला
साहीन सारे सारे काही पण
गरज त्यांची मज जगण्याला

दि.१८/०५/२०२०
सकाळी ५.१७ वा.



## (४)
## हा चेहरा मज

मी निघालो दूर जेव्हा
दिसला अर्धा चेहरा
पडद्यामागे लपून मजवर
देत होता तो पहारा
जाणे हे गरजेचे आहे
का तुझे मज सांग ना
चार दिन अजुनी जरासा
मजसवे तू थांब ना
तू तिथे सीमेवरी
मातृभूच्या रक्षणा
घास ना जातो मला अन्
कुठेच लागे लक्ष ना
अभिमान आहे गर्वही तू
पुत्र ऐसा वीर जो
मी जाणते सारे परंतु
खचतो कधी हा धीर जो
मी तुझी तुजसाठी येथे
प्राण वाती लावूनी
वाट पाहीन जीव नयनी
त्याच ज्योती ठेवूनी
कधी मी पाहीन कधी रे भेटू
कसे मी रोखू स्वत:ला
तू दिसेपर्यंत डोळे
ढाळतील ना अश्रूला
जा प्रिया कर्तव्य करण्या
आयुष्य लाभू दे तुला
माझे जेही आहे ते सुख
देवा दे मज राजसाला
हा चेहरा किती बोलतो
किती मागतो किती सांगतो
हाच चेहरा बने प्रेरणा संवेदना
मी समरी याने विजयतो
मी जागतो हा जागतो
मी पाहता स्वप्नी पुन्हा
वर्षावतो ते प्रेम मजवरी
करतो जरी मी त्याचा गुन्हा
हा चेहरा मज जागवतो
जोजावतो अन् जगवतो
यातची मी सारे माझे
जगणे पुन्हा रूजवतो
येईन मी तुज सांगतो
झडकरी कामे करून
सारखे पाहीन याला
यावरीच पुन्हा मरून

दि.२०/०५/२०२०
दुपारी १.३९ वा.



## (५)
## नजर कातिलाना

अशी जीवघेणी
नजर कातिलाना
आम्हा मारते अन्
तिला ती खबर ना
किती खोल ते
डोळे रोखून जाणे
किती भाव ते
आपुलेसे पाहणे
किती टोकणे
तू न दिसणे हे म्हणणे
शब्दाविना शब्द
नजरेत येणे
झेलून त्या रागा
अनुराग झेलीन
तुझे रुसवेफुगवेही
आनंदे पेलीन
कशाला आवळतेस
अजून घट्ट पडदा
दिसू दे मला चंद्र
राणी तो एकदा
किती मी तरसतो
तुला पाहण्याला
घायाळ होऊन
प्राणफुले वाहण्याला
नको वाटते मज
पहावेच काही
किती पाहिले
तुझ्यासम न काही
नजरेत राहीन
दिलातंच विसावीन
अशी ही नशीली
मस्तानी जपीन

दि.२१/०५/२०२०.
सायं ६.२१ वा.



## (६)
## असा बंदी झालो

अशा रम्य वेळी
प्रेम देई आरोळी
प्रिये तू गं गढलीस
पुस्तक हे जवळी

तुझी दृष्टी पुस्तकी
तू त्यातंच मग्न
तूच तू माझ्यामस्तकी
जीव तेथेच लग्न

तू वाचंत जाशी
द प्रिझनर एक
इथे बंदी बसलाय
तुझा मीच नेक

तुझ्या या गुणांनी
फिदा मी सदाच
मराया तयार मी
प्रत्येक श्वास

असा बंदी झालो
तुझ्या कारागृही
पहारा न कोणी
अनभिज्ञ तूही

इथे जन्मठेप
असो कारावास
मिळो मजला नित्य
तुझा सहवास

न सुटण्याची धडपड
न मुक्तीची चिंता
उलट राहण्यासाठी
मनाचाच गुंता

दे मज कोरभर
भाकरीचा तू भाग
जुळू दे तुझ्याशीच
सौभाग्य आज

तू अशी वाचतेस ना
मी चेहराच वाची
थांबेन जन्म
तुझ्या छंदासाठी

तुला जे जे प्रिय ते
प्रिये तू करावे
मी जपणे तुला
व्रत हे माझे ठरावे

तू कर साधना
ज्ञान आराधना
केवळ मला तू
तुझा मानना

एकच नजर
इश्कानी भर
मी पुस्तकही होईन
सजीव जन्मभर

देहावर अक्षरं
कोरून घेईन
प्रेमाची गाथा
आपुल्या मी होईन

दि.२१/०५/२०२०
रात्री १०.२८ वा.



## (७)
## तुला पाहुनी

हा महाल पाहण्या दोघे आलो
परिचय आपलाही घेत गेलो
नव्या विवाहाने जुळलेल्या
रेशीमगाठी जाणत गेलो
      असाच राजा असेल इथला
      तुझ्यासारखीच त्याची राणी
      हे आपुले बघ राज्य आता की
      नवी रचू चल प्रेम कहाणी
ते दोघेही फिरले असतील
दालन दालन शृंगारातंच
हसले असतील, बसले असतील
राहिले असतील स्व -विश्वातंच
      हा खांब असे बघ जणू सीमा ती
      त्या काळाची ह्या काळाची
      इकडून पाहून घेऊ भूतकाळ
      तिकडून चाहूल वर्तमानाची
इकडे पाहता दिसशी मजला
ती राणी प्रणयिनी सुंदरी
अलंकार भूषणे मढलेली
उतरे अप्सरा अशी भूवरी
      राजा असणार पुराच बुडला
      तिज सौंदर्या सरितेत
      इथला कानाकोपरा सांगेल
      प्रेम तयांचे कानात
आता पाहतो तुला मी तिकडून
माझी रमणी तू कमनी
तुझ्या येण्याने रस बहराला
इच्छा पुरतील ज्या ज्या मनी
      क्षण हे राजस लोभस होतील
      भविष्य सुंदर घडवून जातील
      आठवू आपण जेव्हा जेव्हा
      इथल्या स्मृती या दाटून येतील
तुझ्या दिलाचा राजा झालो
तू प्रेमाचा अभिषेक केला
चिंब नाहलो त्या आनंदी
मधुचंद्र बघ गाली हसला
      तू चांदणी की प्रकाशधारा
      राजमहाल हा उजळून गेला
      फिरता फिरता तुझ्यासवे हा
      पुन्हा त्याकाळी रमून गेला
साद ऐकतो त्या प्रणयाची
नवे पान मी लिहून जाईन
तुला पाहुनी, तुला जाणुनी
मला तुझ्यातंच जोडून देईन

दि.२२/०५/२०२०
सकाळी ६.३७ वा.



## (८)
## फूल गुलाब मी व्हावे

गाली गुलाब हासला
रंग तोच पसरला
कळी कळी उमलता
आली पाकळी भराला


दिसे सारेच गुलाबी
गुलराणीची नशा ही
गंध गोड गुलकंदी
मुरताच ही पाकळी

तिचे उमलणे काही
बाई साधे सुधे नाही
फुलराणी आहे गोड
तिची मस्ती कुठं नाही

तिला धरताच हाती
भाव प्रीतीचे जन्मती
अशी सुंदर ही मूर्ती
मदनाची होय रती

कळी गुलाबी गुलाबी
प्रिया गाली पसरावी
फूल गुलाब मी व्हावे
गाणी गुलाबीच गावी

दि.२३/०५/२०२०
दुपारी ३.२३ वा.



(९)

## तुझ्या पावलांचे

तुझ्या पदस्पर्शासाठी
जोडे दुकान वाहीन
एकदाच येशील तू
आर्त वाट मी पाहीन

बालपणीची तू माझी
प्रीत मनात वाढली
तुला वाढताना देख
कळ जीवाने काढली

कुणी पाहुनिया तुला
मनी आस धरताती
इथं जीव तुटे माझा
तिळतीळ तुझ्यासाठी

तुला जपण्याच्या साठी
जोडे जीवाचे करीन
मऊ मऊ पावलांना
अंगावर मी वाहीन

पाय लक्ष्मीचे तुझे
लागो अंगास या माझ्या
मोजडीचे भाग्य फळो
एका स्पर्शाने या तुझ्या

तुझी घागरा ही चोळी
वर कशिदा ओढणी
बांगड्यांची किणकिण
पैंजणांची रुणझुण

तुझ्या पावलांचे ठसे
उमटतात हृदयी
त्यांचे माप मला सारे
पाठ झाले आजवरी

नाजूक पावलाचा
ठसा उमटो अंगणी
अशी माझी होत ये ना
ये ना राणी तू जीवनी

तुझ्या पाऊलांची मेंदी
रंगा आणीन सुरेख
किती प्रेम करतो गं
आज तरी तू पारख

दि .२४/०५/२०२०
दुपारी ४.०९ वा.



## (१०)
## प्रिये तुझाच राहणार

पानाआडून पाहशी
मुख सुमन लपवी
मला निरखण्यासाठी
तुझी जुनीच अदा ही

नाही खुलून बोलली
तरी सदा तरसली
मला पाहण्याच्या साठी
रीत मनाआड केली

धावताना एक तूच
विसरून की जायची
तुझा अंदाज मलाही
तुझी नुपूरे द्यायची

पाठी पाठी धावताना
दम त्यांना लागायचा
तरी शिरस्ता न त्यांनी
कधी तुझा मोडायचा

तुझं लपंतछपंत
असं मला न्याहाळणं
मला पाहून केसात
मोगऱ्याला तू माळणं

आता सोड वेडे छंद
प्रीत सांग तू बेबंध
वाहू दे ना ती मोकळी
प्रेमनदीला का बांध

मीही कुणाचाच नाही
नाही जन्मात होणार
तुझा होतो, आहे आणि
प्रिये तुझाच राहणार

दि.२४/०५/२०२०
दुपारी ४.२५ वा



## (११)
## हात तुझा हा हाती

हात तुझा हा हाती माझ्या
काय हवे मज अजून पुन्हा
तू मज संगिनी, तू मनमोहिनी
तूच वाढणारी तृष्णा

या हाताची साथ बलवती
कशास आता घाबरणे
जीव आला ना जिवात माझ्या
काहीच नको मज त्यावरणे

किती सांगती मृदुपणाने
सदैव राहीन सोबतीला
हात न केवळ तुझा लाडके
अंतरंग तव संगतीला

तुझा हात हा हात न केवळ माझा
आहे भक्कम आधार
खचलो कितीही हाच सांगतो
ऊठ पुन्हा तू वारंवार

जन्म मिळाला पुन्हा प्रेमाला
धनिक केवढा मी झालो
हा जर आहे हाती माझ्या
कशासंची मी ना भ्यालो

थोडे चालू असेच घेऊन
हात आपुले हातात
स्वर्ग ठेंगणा मला होतसे
वर्षा बरसते शेतात

हिरवे हिरवे कोंब फुटावे
या आशेच्या बीजाला
तुझ्यासवे मी जगत रहावे
साक्षी होऊन बहराला

दि.२५/०५/२०२०
दुपारी ३.०९ वा.



**(१२) तुला पाहता**

अशी तुझी छबी
प्रसन्न हसरी
साडीतून सालसपण
निखरी

एकेरी तू
पदर सोडला
वारा झोंबून
वेडा झाला

नाजूक ऐशा
चार बांगड्या
भुरळ रुपाची या
मर्दा रांगड्या

कर डावा तो
तुझा गुंतला
पदरा सावरशी परी
तो तुझ्यात गुंतला

सहावार शाटिका
नेटकी
नेसण्यात खरी
असे नेट की

नुसते नसते
तिज गुंडाळणे
तिच्यातून मग
सुख धुंडाळणे

पाहणाऱ्याला
नेत्र सुख
नेसणारीही
सुखी आपसुक

झुमके सुंदर
लांबके कानी
केसांची त्यावर
मिजास देखणी

ते मोकळे
उडती भुरभुर
साडीसंगे जुळवती
मग सूर

एकंच झटका
मानेला फटका
केसांचा लटके
पडदा नेटका

त्यावर अशी
हसतेस जशी
जीवाला माझ्या
टांगणी कशी

तुला पाहता
पाहतंच जातो
दिवास्वप्नी मी
असा जागतो

दि.२८/०५/२०२०
दुपारी २.५७ वा.



## (१३)
## डोळ्यात हासणे हे

डोळ्यात हासणे हे
नेहमी तुझे पहावे
अधरे कुलूपबंद
मी नेत्रातची रहावे
इतकी सहज तू ना
देतेस रोखताना
ऐसे कटाक्ष वेडे
मज खुळावून जाती ना
मी मुखडा कसा न्याहाळू
डोळेच कातिलाना
सारेच भाव यांना
येतात सांगताना
अडकून इथेच पडतो
मी खोल खोल जाताना
वाट मनात तुझिया नेते
मज अलगद सावरताना
हे नयन सुंदरी ऐसे की
गुहा कुठली अनभिज्ञ
मी विसरून जातो सगळं
तुज ठरवलेलं जे सांगणं
त्या डोहामध्ये गिरक्या
मन हेलकावते बघ ना
नको अडकू भवऱ्यामध्ये
जरी बुद्धी सांगते मजला
मन कधीच ऐकत नाही
मती थकून जाते तेव्हा
मी विसरून सारे जगणे
डोळ्यावर मरतो जेव्हा
दृष्टी न साधीसुधी ही
द्वार स्वर्गाचे मज वाटे
सुख कधीही ना मिटणारे
अमृतरस त्यातून भेटे
क्षणभरासाठी लवताती
पाखरे पापण्यांची ही
मज अंतर तेवढेसुद्धा
आता मुळीच सोसत नाही
अधरातून हास ना राणी
डोळ्यांस किती दमविणे
ही नजर द्वाड अवखळ
तिज माहीत मज जगविणे
झालो मी झालो समरस
दो डोळ्यांच्या भाषेत
रोज वाचंत असतो यांना
माझे होतील या आशेत

दि.३०/०५/२०२०
सकाळी ११.२३ वा.



## (१४) बंदी मी या डोळ्यांचा

बंदी मी या डोळ्यांचा सखे
रोख नजर वा प्रेमभराने
पहा तूऽऽऽ मजला गडे
घालतो एकंच हे साकडे

मनास माझ्या भूक लागते
या डोळ्यांच्या दृष्टी प्राशना
नजर एकदा पडता तुझी ही
मन माझे आकाशी उडे
पहा तूऽऽऽ मजला गडे
घालतो एकंच हे साकडे

तृषार्त असतो सदैव यांच्या
एका नजरेसाठी मी तर
अमृत पाझरते नयनांचे
ओंजळीत देऽऽऽना थेंब थोडे
पहा तूऽऽऽ मजला गडे
घालतो एकंच हे साकडे

मज ना काही आठवते अन्
सृष्टी माझी तव दृष्टी होते
उलगडते ना सहजासहजी
हे डोळ्यांचे गोऽऽऽड कोडे
पहा तूऽऽऽ मजला गडे
घालतो एकंच हे साकडे

कुणी सांगते जादू करिशी
क्षणात कुणा तू दास बनवीशी
मी तर आलो स्वयंप्रेरणे
जादू ऽ च अशी ही घडे
पहा तू ऽऽऽ मजला गडे
घालतो एकंच हे साकडे

या डोळ्यांचे पंख मिळावे
मग मी स्वच्छंदाने विहरेन
प्रेमनभांगणी लहरेन ऐसा
अनंत व्योम मज पदे तोकडे
पहा तू ऽऽऽ मजला गडे
घालतो एकंच हे साकडे

छंद जिवाला तुला पाहणे
तव दृष्टीने मला देखणे
जुगलबंदी ही रंगत जाईल
जीव तुझ्यावर प्रिये हा जडे
पहा तू ऽऽऽ मजला गडे
घालतो एकंच हे साकडे

जगणे मरणे या नेत्रांशी
तीर्थ जाहले दो डोळे हे
शब्दावाचून वाचून घ्यावे
सखोल प्रेमाचे हे धडे
पहा तू ऽऽऽ मजला गडे
घालतो एकंच हे साकडे

दि.०३/०६/२०२०
सकाळी ११.०१ वा.




## (१५) चेहरा तुझा

चेहरा तुझा गं वाचला
मी दिलखुलास जगतो आहे
किती पुस्तके वाचली पण
तुझ्या चेहऱ्यात शिकतो आहे
शिकणार मी किती असे
शिकून ग्रंथ सारे
चेहरे अजून जवळून मी
जाणत आहे प्यारे
यांना धडे म्हणावे की
जाळेच मोहाचे सुरेख
अडकून पडतो गुंततो
सुटका न त्याची देख
त्या प्रांजलाच्या हासऱ्या
स्मितात राहती कथा
मी माझेच मानले हासू
पोटात घेतल्या व्यथा
ते नेत्र अधोमुख पाहते
सांगून काय जाते
लज्जा की संकोचाची
रेखा गडद होते
ती नासिका सरळ
श्वासात नाम माझे
मी हृदयी नि शरीरी
राहीन प्रियतमे गे
ते मोकळे गं केश
त्या अवखळ बटाही वेड्या
रुळती कपोलप्रांती
स्पर्शास तव लगोड्या
त्या पापण्या बिचाऱ्या
लवती ना खूप वेळा
स्वप्नात गुंग तुजसी
त्या करती नाडथळा
खाली नजर नशिली
सारेच सांगते मला
मी न पाहताही वाचतो
डोळे, भाव अन् तुला
इतके जवळ आलो की
नि:शब्द शब्द होती
हावभाव समंजसपणे
चेहऱ्यात बद्ध होती
शिकणे गं व्यर्थ आहे
जर भाव मी ना रेखिले
इतुका हुशार झालो की
चेहऱ्यात विश्व देखिले

दि.०४/०६/२०२०
दुपारी ३.२१ वा.



## (१६)
## मुखचंद्राला

असा संगम हा जुन्या नव्याचा
इरकल साडी खण त्यावरी
नखरा तुझा परी असा आधुनिक
नथ नि कंठी नव्या घडणीची

केसांच्या सळसळ लाटा त्या
वाऱ्यावरती उसळून जाती
केश मोकळे स्वभाव जैसा
तुझा त्यापरी वागत राहती

असा मोजका तुझा मोहवी
शृंगार मजसी हा जरा वेगळा
ओठी लाली मोठी अंगठी
कुंकुम विरहित ठेवले भाळा

असे वाटते तू खुणावी
भाळावरती लावण्या टिळा
माझे नावची कोरून घेईन
लावीत तुज कुंकुम टिकलीला

असा पदर जरा करे धिटाई
सावरून तू घेतंच राही
तुझ्या अदांनी फिदा होत मी
मुखचंद्राला निरखत जाई

दो ओठांच्या मधून डोकवीत
शुभ्र कळ्या दातांच्या हसती
नजर खुणावी मजला वेडे
डोळे माझेही तुझ्यातंच रमती

अशी लाडकी प्रियतमा माझी
काहीही घालते सुंदर दिसते
जातिवंत सुंदरीच असता
अन्य कशाची गरजंच नसते

दि.०८/०६/२०२०
सायं ६.११ वा.




## (१७)
## दृष्टी करारी

कसले मादक हे बघणे
हाय जीवघेणे जीवघेणे
जीवापाड मज पसंत तुझे
नजरेने मज पिऊन टाकणे

ही नजर म्हणावी
की तलवार दुधारी
दिल चिरचिर चिरते
हाय तुझी दृष्टी करारी

तू हक्क सांगतेस
रोखून पाहतेस
मजला दटावतेस
अनुराग दावतेस

डोळ्यातील भवरे
गरगर फिरणारे
मज कह्यात घेऊन
अडकून ठेवणारे

तो साथीचा
शृंगार तिखट पण
ती भाळावरची
टिकली की गोळी

ती ओठांवरची
लाली गडदाची
मज रागावते ना
रागी शब्दाची

ना शब्द बोलते
भाषा बंदीची
नजरेत कोंडते
आशा धुंदीची

ती बट रुळणारी
द्वाड खळखळणारी
गुंततो तिथे ती
नागीण सळसळणारी

ते कसे माळले
गुलाब गडदची
लालीसंगे रंगून
कॉफी गेली

बोरमाळ गळ्यातील
दाणे टपोरे
मी मोजत सुटतो
तर हसती बोरे

ती सुती काळीभोर
चंद्रकळा तर
खण शोभे चोळीचा
रंगे जुळतो खरा वर

नाकावरती राग असा हा
अनुरागाचा चिडका भाऊ
पाहून ऐशी करते मजला
सखी ही गिळू की आता खाऊ

सारे वागणे प्रिय मज असते
तुझ्याच नजरेत मन हे वसते
कसे सांगू मी प्रियतमे तुजला
स्वप्नं संसारी इथेच दिसते

दि.०५/०६/२०२०
सायं ०६.०८ वा



## (१८) तू सुंदर की

तू सुंदर की साज तुझा हा
शृंगाराचा बाज तुझा हा
सांग ना प्रिये, भाग्य यांचे की
तुझ्यामुळे ते उजळती अहा

त्यांच्यामुळे तू खुलते की
ते खुलती तव स्पर्शाने
दोघांचे लावण्य बहरते
परस्परांच्या हर्षाने

रंग गुलाबी असा घागरा
चोळी त्यावर कशिद्याची
जरदोजीचे काम शोभते
नक्षी काठाला फुलवेलीची

विणकामाने जडसर झाला
पेलून नेणे कठीण तुला
दो हातांनी उचलून थोडा
तुंही सांगशी जडपणाला

असा घागरा तुज सौंदर्या
भरास आणतो खरेच ना
वरती ओढणी चांदणगोंदणी
पारदर्शी रूप बिंबे ना

त्यावर कंकण हातभरून तू
दोन्ही करांना शोभविले
गळ्यात कुंदनहार घातला
नक्षत्रांना गुंफीयले

कर्णभूषणे डुलती कानी
केशरचना सुंदर झाली
त्यात गुलाबी फुले माळूनी
अलगद वाकून ती बसली

असा मुखाचा तुझा चंद्रमा
शरदाचे जणू झाले चांदणे
हास्यामध्ये बुडलो राणी
छंद जिवाला तुला पाहणे

स्मित हास्याची चंद्रचकोरी
डोळ्यामधली लाज अधुरी
कुठे रमली बघ नजर रिकामी
तू कांता कमनीय माधुरी

दि.०८/०६/२०२०
रात्री १०.०२ वा.



## (१९) प्रीत ऋतू

अगं अशी येऊ नको तू
पाणवठ्यावर
चलबिचल होते
बघ लाटांवर

किती शांत ते
वाहत होते
तुला पाहता
बेचैनी येते

उगाच लाटा
खालून वरती
कासावीस होत
उसळून येती

ते मोकळे केश
एका बाजूला
बटाही उडती
आजूबाजूला

त्या खणखणत्या
तुझ्या बांगड्या
जलांतरी बघ
कळ आणती रांगड्या

ती चोळीची
नक्षी पानांची
गोरी पाठ ही
लाखमोलाची

घागर बुडवून
गाली हसतेस
बेचैनी इतरांची
पाहतेस

कुणी तळमळते
तुझ्याचसाठी
पाहून तुझिया
हसू ये ओठी

नको राणी तू
सोडू बघ असे
मदनबाण
जीवघेणे ऐसे

त्या घटात भर
मजला तू तर
आणि उचल मज
सहजी कटेवर

उसळून तुजला
नक्की भिजवीन
प्रेमजले अंकुर हा
रुजवीण

तू भिजलेली
मीही ओला
प्रीत ऋतू
वर्षा हा आला

दि.१६/०६/२०२०
रात्री १०.०० वा.



### (२०) का ओढ असते अशी

का ओढ असते अशी
लावण्य मना खेचते
विलसते रूप देखणे
ही नजर लज्जा वेचते
हे डोळे अनुपम सुंदर
मृगनयनी कमलनयनी वा
रक्षण त्यांचे करण्याला
तू ओढली कज्जलरेखा
वर पापणीवरती शोभे
रेखीव रेष रेखलेली
हे डोळे म्हणू सागर
सुख घागर ती भरलेली
त्यावरती धनुषकमानी
शोभती या भृकुटी दोन्ही
दो नयनांच्या मधुनी ही
नासिका चाफेकळी की
त्यात सुंदर नथनी गोल
नाकाचा वाढतो डौल
तिज सांभाळते तू छान
केसात खोवुनी खडीदान
ते ओष्ठ तुझे की कलिका
की पाकळ्या मृदुल सुरेखा
अधरातून जीवही अर्धा
अडकून जातो हा माझा
ते दात शुभ्र डोकवती
हास्यात गुंग मज करती
ते दाणे डाळिंबाचे
ओठास रंग ही देती
ती हनुवटी बघ थोडी
येऊन मज बोले पुढती
तिज पकडून उचलावा मी
हा चंद्रमुखवटा वरती
ती भाळावरची बिंदी
लोलक तो हलतो वरती
जीव कुंदन होतो माझा
लल्लाटी तेजा भरती
ती नजर वाकते खाली
स्मितहास्य उमलते गाली
मी पुन्हा पडतो प्रेमात
मज तार तू प्रेमावरती

दि.१९/०६/२०२०
रात्री ०९.३५ वा.



## (२१)
## का अशी तू उदास राणी

का अशी तू उदास राणी
वाट माझी पाहशी
दूर मी येथे अडकलो
समजुनी तू घे जराशी

तो तुझा शृंगार सारा
बघ असा दिसतो फिका
हास थोडीच गाली
मी इथे राहीन सुखा

तन्वी तू नाजूक ललना
प्रेम इतुके करशी की
राहशी कितीदा उपाशी
तू नको वागू अशी

वाटते मज यावे येथून
उडुनिया तुजजवळी की
मन तिथे तुजपाशी राहे
देह केवळ सोबती

तू अशी नाराज ना हो
येतो मी पटकन झणी
फुलता चेहरा पाहण्याला
उत्सुक मी आहे गं राणी

दि.२०/०६/२०२०
सायं ०६.४७ वा.



## (२२)
## संजीवनी मज जीवनी

तू अशी ही धवल साडी
नेसुनी उभी मजपुढे
कंचुकी ती लालवर्णी
शोभते किती तुज गडे

कंठीमध्ये लोंबणारे
मोती सुंदर नाचती
बोलताना शब्द मधुर
ते तुझे की वेचती

कानी शोभून दिसती तुझिया
कर्णलोलक साजेसे
तव मुखाच्या संगतीने
तेही वागती आपुलेसे

भांग मधोमध पाडुनी तू
केस किंचित बांधले
पृष्ठी रुळत्या केशसरिते
गजऱ्याने तू गंधिले

हाती कंकण किणकिणे हे
तुज मनीचे सांगते
भाव सारे जाणुनी ही
ते अबोल की राहते

तू अशी बघतेस जेव्हा
चुकतो ठोका काळजाचा
अन् वरी हसतेस पाहून
तुजवरी लळा या जिवाचा

साधी सोज्वळ संगिनी ही
संजीवनी मज जीवनी
मोहवत्या क्षणक्षण क्षणांनी
बरसते अनुरागिणी

दि.२७/०६/२०२०
सकाळी ०९.३५ वा.



## (२३)
## प्रीतवर्षा मजवरी

प्रतीक्षेत थकल्या नयनी
स्वप्न काही नवे भरू दे
काव्य माझे वाचणारी
एक भेटही रम्य घडू दे

का तुला माहीत नाही
मीच आहे तो कवी
ज्याच्या ओळी अन् कविता
नांदती तव अंतरी

कागदाला मस्तकावर
घेऊनी मोदात तू
आणि माझ्या काही गझला
गुणगुणत नादात तू

काव्य या मनी जन्मते
परी तूच त्याची मोहिनी
एकदा मज भेट वेडे
मरतो मी निजभाविनी

काव्य राही ह्रदयी तुझिया
मीच तो काव्यापरी
एकदा प्रत्यक्ष भेटून
प्रीतवर्षा मजवरी
करी प्रीतवर्षा मजवरी

दि.३० ९/२०२०
सकाळी १०.३०वा.



## (२४)
## चांद अंबरात

लिहिशील नाव माझे
वाळूत रेशमाच्या
हातात लेखणी ही
शाईने तू दिलाच्या

गर्जून जोरजोरे
सांगेन सागराला
तू प्रेयसी ही माझी
हेवा असेल त्याला

लाटांवरी तू ऐक
तुझेच नाव डोले
तूचि अथांग सागर
प्रीतीची नाव चाले

असशी किनारा माझा
वाहून जाऊ कोठे
भेटेन गे तुलाच
तू भाग्य माझे मोठे

रत्नांची खनी सागर
तू माझे रत्न आहे
लाजून हसशी जेव्हा
रेखून नाव माझे

मिटले तरी मिटू दे
माहीत हे मलाही
हृदय किनारी तुझिया
दृढ नाव माझेच राही

ऐसे गढून जाणे
माझ्याच विचारात
तुजसी निवांत पाहणे
जणू चांद अंबरात

दि.०७/१०/२०२०
रात्री ९.१० वा



## (२५)
## गजरा बहु प्रीतीचा

इतुके सुंदर गजरे पाहून
सखी तू आठवते
उगा मनाला माझ्या तू तर
तुझ्याकडे पाठवते

असतो घाईमध्ये येण्या
घराकडे वळलेलो
गंध येता हा मंद फुलांचा
उगाच मी अडखळलो

मग आठवतो तुझा चेहरा
वाट माझी पाहताना
आणून गजरा माळीन अलगद
वळवून हाती घेताना

शिणवा थकवा अस्सा जाईल
क्षणात तो विरघळून
माझाही तो दमला शिणला
रुतबा उत्साहून

कधी आणतो गंध मोगरी
कधी कुंद चांदण्या
कधी जाईच्या कधी जुईच्या
अबोलीच्या गोंदण्या

कधी उमलल्या अर्ध्यामुर्ध्या
कधी कळ्या मिटलेल्या
कधी लख्ख त्या हसुनी खिदळुनी
फुलूनिया आलेल्या

कधी हा मरवा मधेच विणला
गंध माद चढलेला
मादक तुझिया मोहक ऐशा
अदांवरी भुललेला

असा दरवळो दोघांमध्ये
गजरा बहु प्रीतीचा
कसा हा सूचक असतो आपुल्या
अनुराग रीतीचा

नकोच काही बोलूस राणी
बोलून जातील नजरा
शब्द हजारो फिकेच पडतील
वरचढ होईल गजरा

दि.११/०३/२१
रात्री ०८.०३ वा.



## (२६)
## बकुळी माझ्या मनातील

मोहविती मज ही फुले गं
बकुळीची नाजूकशी
तुझ्या पापण्या उलगडती बघ
स्वप्ने तव कोमलशी

तुझे हास्य अलवार स्पर्श ते
ती लज्जा नयनातील
शब्दांविन ही सांगून जाते
बकुळी माझ्या मनातील

ती भेट आपली पहिलीवहिली
दोघांमध्ये हीच बकुळी
हिने घडविली भेट सुगंधित
गालांवरती हीच रुळली

तू लाजरी की फुले हिची ही
तलम नाती सांगून जाती
मजसी दिसती अदा तुझ्या ह्या
आजही जेव्हा बकुळी हाती

इतकी नाजूक प्रीत आपुली
नाजूक माझी सखी सावळी
तूच शिकवली रीत मला ना
देऊन सारे आत पोकळी

दुःख गिळावे सुख अंथरूनी
फुलणे गळणे सडा टाकोनी
कदर कुणी जर करील खरी ती
सुकेल बकुळी कितीदा हासुनी

दि.०४/०४/२१
रात्री ०१.११ वा.



(२७)

**ती पाठमोरी**

ती पाठमोरी
साडी नऊवारी
कांतीने गोरी
माझी नवी नवरी

सौंदर्याची ती आगरी
केसांमध्ये खुले मोगरी
अंबाड्याची केशनगरी
दागिन्यांची ऐटी दोरी

पाठ तिची मज खुणवून सांगे
मी पाठीशी सदा रहावे
स्वप्नं पुढे ती पाहील जे जे
मी त्यांच्या पूर्तीत रमावे

मेंदी हाती नक्षी बोलकी
रंगरंगली जीवन नाती
चुडा खणखणे कोमल हाती
लक्ष्मीरूपे ती ये सांगाती

सुहास्य वदना प्रिया ही ललना
तीच भावना तीच कामना
जन्म चालतो संगे अवखळ
सुंदर रती ती मोही मदना

ती पाठमोरी स्मृतीत गहिरी
छबी कोरली मांडवदारी
ये राणी तू सुखसंसारी
भाग्य फळावे तव पदचारी
ती पाठमोरी,
चंद्रचकोरी
कर दे करी
तू माझी नवरी

दि.०७/०४/२१
दुपारी १२/२३ वा.



(२८)

## आयुष्याचे सुंदर गाणे

असे जुळावे सूर तुझे नि
माझे प्रियराणी
क्षणात ओठी उमलून यावी
प्रीतभरी गाणी

सप्तसुरांसम सप्तपदीही
चालावी दोघांनी
सुरसुरांवर घेतली वचणे
सप्त जन्म संगिनी

आनंदाची लहर उठावी
काळजातुनी काही
उत्साहचि हा संचारावा
संपून जावी विराणी

मी साद दिली तू प्रतिसादाने
ताल लयीस जपावे
सुंदर कोडे सहजीवनाचे
संगीताने सुटावे

किती राग अनुरागे गाऊन
मैफिल रंगत जावी
शब्देविणही सुरावटी तुज
गाली रूळुनी कळावी

एक सूर एक तान एक लय
तू मी एकचि व्हावे
आयुष्याचे सुंदर गाणे
ऐसे जुळुनी यावे

सप्तसुरांनी साथ देऊनी
शेवट सुरेल व्हावा
एक अनामिक सूर भैरवी
अलगद कानी यावा

दि.०१/०५/२१
रात्री १०.४८ वा.



## (२९)
## कमनीय कामिनी

कमनीय कामिनी
चमचमती दामिनी
मन सावरणे कठीण
मज प्रिया मनभाविनी

ती सहज सजते
तरी अनुपम भासते
ती उभी राहते
मन थबकत राहते

ती कर्णफुले लोंबती
केश मुखाभवती रुळती
ती लाली अधरांवरची
मनस्वप्नेही भाळती

ती अशी नसते साडी
साडी असते साधीच
देहाने नेसली साडी की
साडीने देह आधीच

मिळत्या जुळत्या बांगड्या
खणखणीत वाजत जाती
दिमाखाने मिरवत जाते
कशिद्याची कंचुकी वरती

नुसते हे रूप आठवते
जणू चित्र मनातच बसते
कसे होईल ते होवो ना
अनुरागिनी मनात ठसते

ती नजर दिल चिरणारी
वर मधाळ अमृतवाणी
बहु पुण्याने मिळते ना
प्रिया असली गोजिरवाणी

दि.३१/०५/२०२०
सकाळी ८.५४ वा.



## (३०)
## रुसणे तुझे

नको रागावणे ते
रुसणे तुझे
छान नाकास व्यर्थ
लाल करणे तुझे

कशाला प्रिये सांग
गुस्सा इतका
अबोला तुझा
बोलका इतका

डोळ्यात भांडून
ओठात मौन
तू माझीच आहेस
राग साराच गौण

केसात लाटा
उसळून येती
मजला बुडविण्या
घेऊन जाती

हा ऐलतीर अन्
तो पैलतीर
होडी तू माझी
तू तारणहीर

उगा हनुवटीला
रागे हलविणे
गालांना स्फुरवत
नाका मुरडणे

डोळ्यात आग
भुवयीत राग
लटक्या रागात
ओसंडतो अनुराग

अनुनय करीन मी
असा प्रेमवीर
तुला मनविण्या
युक्त्या कित्ती हाजीर

दि.०८/०६/२०२०
रात्री १०.२३ वा.



## (३१)
## पालवी नव उमलुनी

का मनी हुरहूर वेडी
जिवलगा भेटीस ही
तो तिथे तुज गुंफताहे
का अशी बघ ओढ ही

उमलुनी ऋतू फुलले सारे
हिरवाई पसरे वनी
नवीन जगणे रंगताना
नवलाई दोघा मनी

का अशी धडधड उरी
मज चैन नाही अंतरी
घे मला समजून सजना
लाज उमटे अंबरी

त्या तिथे बघ रंग पसरे
इंद्रधनुसम अंगणी
अधरी थरथर वाढलेली
दव दवाच्या कोंदणी

ही अशी का भेट होईल
पालवी नव उमलुनी
रोमरोमी भावना मज
तुज मनातून उमलुनी

क्षण असे क्षणभर कसे
ते दंगलेले साजनी
तू सदा मजजवळी राहशी
मन तुला बघ दिधले मी

ती तुझी हुरहूर नि सूर ते
मोद भरले अंतरी
टिपून घेईन प्रेम सारे
नवनवी तू सुंदरी

दि.२७/०८/२१
सकाळी ०९.२० वा.



## (३२)
## प्रसन्न आभा

मज खुणावते ही प्रसन्न आभा
सुंदर रूपा भेटवते
स्वर्ग काय तो दुजा सांग ना
मज कुणी अप्सरा आठवते

डोळ्यांमधुनी वाहती अवखळ
निर्झर प्रेमळ सरिता या
अन भुवयांच्या वक्र टेकड्या
शोभित त्यांना करण्याला

सरळ सुंदर अशी नासिका
गंध अलौकिक प्राशतसे
अन् गजऱ्यांचा सुवास मजला
तुजजवळी हा खेचतसे

दंतमुकुल की दाणे दाडीम
ओठांवरती अमृत हे
रंग गुलाबी गुलाब देतो
जिवनी जीवन होत असे

गालांवरती हास्यसरोवर
कुमुदिनी खुलली खळी रुळे
हनुवटीच्या खुणा रेखती
शृंगाराचे मर्म कळे

अशी सुंदरी येता जीवनी
काय अजून मी मागावे
हृदयांतरीच्या प्रेमसागरे
तिला नित्य मी भिजवावे

दि.१२/०७/२०२०
सायं ०७.२७ वा.



## (३३)
## **लक्ष्मीपद हृदयी**

सौंदर्य दडले खरे पदकमली की
पैंजणांची माधुरी
कोणते लावण्य सरस हे
प्रश्न मनी वरचेवरी

एक ही छबी बोलते, पदी चालते
नवयौवना नित सुंदरी
पदी वाहिले हृदयास मी
रुणझुण नादमय घुंगरी

आकार आकर्षक पाऊले
चालती जणू भूवरी
आली उतरूनी या इथे
कोणी अप्सरा दिव्य ती

पायांना अर्धा चंद्र चुंबितो
वक्रांकित ही कमान
अंगुली नाजूक जणू कळ्या की
सोनचाफी उपमान

नखे रेखिली सुंदर साजुक
रंगप्रभा लालेलाल
जोडवी सजली फुलांसारखी
फुलावर फुलही कमाल

पैंजण वेडे गोल गिरकी घे
फिरते चरणांशी
प्रेम तयाचे तिजला कळण्या
जन्म पदांवरती

चालशी चंचल पदविभ्रमही
थबकून कधी पाही
जन्म सोपवीन पदांवरी या
लक्ष्मीपद हृदयी

दि.०६/१०/२०२०
रात्री ११.१३ वा.



## (३४)
## ओल्या धुतल्या केसांना

ओल्या धुतल्या केसांना तू
अशी बांधुनी येशी
तयार होऊन साडीमध्ये
हास्य अधरी फुलविशी

साधेसुधे ते तुझे राहणे
डोळ्यातून प्रीती
हाती घेऊन गुलाब दोन तू
लाल नि पिवळ्याशी

जणू विचारिशी मैत्र हवे की
प्रीत सांग रे तुला
मजला काय गं तू देशील ते
प्रेम मैत्रीतून मैत्र प्रेमाला

मजला वेड हे तुझेच केवळ
तू जे आणीशी भाग्याचे फळ
तू जे करिशी सारे प्रिय मज
तुझ्याच हाती जन्म सुफळ बघ

क्षणात ओल्या केसांमधुनी
मला वाटते मी चिंब होऊनी
तुलाच बिलगून रहावे कायम
असा श्वासही परिमळ होऊनी

दि.१२/२२/२०२०
दुपारी ०१.०७ वा.




## (३५)
## **सांज म्हणे वेडी**

आज सांज म्हणे वेडी
गोड थंडीत बुडाली
थंडी गुलाबी की बंडी
तिने अंगी पांघरली

बंडखोर थोडी थोडी
अवखळ वेडी लाडी
वेड तिज ऐसे लागे
लागे ऋतूची या गोडी

गोडीगुलाबीने ऐशी
गुलाबात हास
हसली की राधा
श्याम गुलाबीच रास

रास रंगांची उधळे
संध्याराणी गगनात
गगन मगन त्यात होई
रंग त्याच्याही मनात

मनी असती जे रंग
आत खोल दडलेले
दडूनिया प्रेम सारे
सारे आत वाढलेले

रंग पसरला आता
मला सांगणे की सोपे
प्रियेदारी निशिगंध
मन गुलाबाच्या संगे

रात्र तरुणी सुंदरी
जरा सजुनिया आली
वाट पाहण्या आधीच
माझी वाट गंधाळली

रंग असेच राहू दे
थोडे वेडे ते अल्लड
आज स्वर्गीचा वसंत
इथे मला ना उसंत

मन चिंब गुलाबाने
आत रुधिर गुलाबी
प्रिया गुलाबी नि तिची
रिझवणंही गुलाबी

दि.०४/१२/२०२०
रात्री ०९.०१ वा.




(३६)

## या फुलांना सांग ना तू

या फुलांना सांग ना तू
सारखे हासू नका
मन वळवून ते तुझ्यासम
लाजेने वाकू नका

एकतर तो स्पर्श तलमी
मऊमऊ तुझाच ना
तू चिडलेला रंग गाली
पाकळीवर तोच ना

मी तुझा अनुनय करण्या
आलो जवळी की जशी
दृष्टीला मुरडून तेव्हा
दूर तू हलकेच होशी

ही फुलेही अगदी तैसे
भुंग्याला छळतात की
तो करी गुंजन परी
वाऱ्यासवे वळतात की

हाती धरता वाटते मज
हा तुझा मुखडा जणू
तेज ओसंडून वाहे
आणि पुलकित ती तनु

पापण्याही नयन दोन्ही
अधर वाटती पाकळ्या
ते तुझे करतल मृदुल अन
भाव कलिका भासल्या

सांग ना वेड्या फुलांना
का असे डुलता तुम्ही
अगदी माझ्या प्रियतमेच्या
सारखे खुलता तुम्ही

पाहता यांना सदैव
आठवांची दाटुली
जीव कासावीस माझा
होत नाही भेटुली

असू दे पण राहू दे राणी
यांनी सोबती राहणे
तू जरी ना भेटू शकली
तुज फुलातच पाहणे

दि.०६/०२/२१
सकाळी ११.०० वा.



## (३७)
## तू गुलाबी गंधवेडी

गावरानी गुलाब होते
अंगणातून डोलणारे
गंधवेड्या जाणत्याला
मूकस्पर्शे बोलणारे

रोज ते फुलुनी यायचे
वाड्यामध्ये गावच्या
एक मुलगी थबकली अन्
फूल भुलले रसिक त्या

हुंगुनी परिमळ ती थांबे
क्षण कधी क्षण दोन ती
आजही समरते मला
फूल जपणारी अशी

अंगणातील तो गुलाब
आजही पाहे की वाट
येईल कधी ती जवळी जी
पाहून जपतसे गंध थाट

नाही फुलला तो तसा
तीही ना आली अंगणी
ते तिचे असे थांबणे
त्या फुलांच्या कोंदणी

ये पुन्हा ये ना अशी
थांब त्या वेड्यासवे
ते फुलून येतील पुन्हा
आतुनी माझ्यासवे

तू गुलाबी गंधवेडी
भावना अलवार त्या
तू कुठे तो गुलाब कोठे
भावना हळुवार त्या

दि.०५/०१/२०२१
रात्री ११.३२ वा.



## (३८) पाहून मोगरीच्या

पाहून मोगरीच्या
हसऱ्या अशा फुलांस
का आठवे मला तो
आपुला असा प्रवास

ती भेट पहिलीवहिली
मी आणल्या कळ्या ज्या
ना कळते आजही मज
तुज पाहता त्या फुलल्या

मग भेटलो कधीही
या मोगरीच्या साक्षी
प्रीतीत भरली नेहमी
आपुल्याच गंध नक्षी

ते वाट पाहणेही
असते न जीवघेणे
केलीच नित्य सोबत
गजऱ्यात मोगरीने

भेटींचा गंध चढला
नात्यात भाव भरला
आलो जवळ इतुके
जीवन संग ठरला

ती वेळ विवाहाची
केसात मोगरी ही
गेली फुलांसवे मग
लाजून नवरी ही

ती रात्र मीलनाची
शय्या भरून गेली
सुख चांदणे सुरम्य
मोगरीच ठरून गेली

ते क्षण असे सुगंधित
दरवळती आजही बघ
आयुष्य गंधभरले
ऋण केवढे तिचे बघ

जातोच आजही हा
रुसवा तुझा तिच्याने
सोपे करून जाते
जगणे ती उमलण्याने

सहजीवनी सदैव
होती नि राहील ती
सुरभीत मन जीवन
नेहमीच पाहील ती

दि.०१/०३/२१
दुपारी १२.३७ वा.



## (३९)
## **हातात हात राणी**

केव्हा कुठून येती
प्रिय माणसे मनात
होऊन आपुली ही
येती ना जीवनात

तो हात हाती धरला
प्रिय स्पर्श नेहमी स्मरतो
ते प्रेमबंध दृढ नि
मृदगंध मनी उरतो

आश्वस्त झालो होतो
कर हा करी धरूनी
न पाहताही होतो
पाहंत तुज फिरूनी

ती खुण प्रीत सांगे
तव अंगुलीत राजे
नाजूक अनामिका
नाजूक गूज सांगे

तो पावसाळा पहिला
हातात हात आला
ते चिंब ओले स्पर्श
हर्षात ये शहारा

ती प्रेमवेला प्यारी
ती उद्याने विहारी
हातात हात देत
वचने जी पाळलेली

संकट असो खुशी वा
नाराजी दूर व्हावी
ना शब्द पुरे होती
केवळ गे हात हाती

राहो असाच नित्य
हातात हात राणी
तू जवळी नेहमीच
मधुराणी रातराणी

दि.१९/०३/२१
सकाळी ०९.५४ वा.



## (४०)
## सुगंधी सुरंगी

सुगंधी सुरंगीचा गजरा तू माळ
गंधात बुडवून तो घमघमाट

किती उंच हे कोकणातील झाड
टोकावरी त्याच्या उमलून ग्वाड

नाजूक फुले हा बहर शेंड्यावरी
तोडून आणण्याची मेहनत खरी

किती कोश परिमळती अंगी हिच्या
किती गंध भरले अंतरंगी हिच्या

अति साजुल्या नाजुका या कळ्या
गजऱ्यात विणने हलक्या करा

ह्या रानसुरभीच्या मोहात जावे
सुकतील त्यांना अधिक सांभाळावे

कोकणची फुलराणी वेडी सुरंगी
दरवळ तिचा गजऱ्यातूनी दिशांनी

तिला पाहता कोकणा आठवावे
सुरंगीस हृदयातसे साठवावे

तिच्या आणि माझ्या प्रीतीत संगी
अशी गोड रंगाची गंधा सुरंगी

दि.१०/०४/२१
स. ११.५७ वा.



## (४१)
## दोषी सखये मोगरा

दोषी सखये मोगरा
मज दोष तू देऊ नको
पाहतो मी त्यास आणिक
न कळे का मी बहकतो

कुठून येती ही फुले
मज नेती तुझिया आठवा
मन क्षणी आभाळ होते
तो क्षणांचा बघ थवा

पाकळी अन् पाकळी
गंधात बुडूनी हासते
मी काय करू मज सांग तू
त्या फुलात तू मज भासते

कवळे मल्मली स्पर्श अंग
गंध श्वासातून ये
तीच सुरभी मोगऱ्याची
धुंद मज वेडावते

रोमरोमी अणुरेणू तुन
मोगरा मी होतसे
त्या तुझ्या बघ अंगोपांगी
अन् विसावण्या लोभ ते

कल्पनेतील मीलनाच्या
चालल्या कथा मोगरी
आजही तू भासते मज
तीच लोभस नवरी

गंध होते मोगऱ्याचे
की तुझी ती मोहिनी
आजही मी तृप्त त्याने
मोगऱ्याच्या या मनी

दि.०८/०५/२१
सकाळी ०८.४३ वा.



(४२)

## एकदाच मज आपुला म्हणशील

रूप असे तव लोभसवाणे
पघळून जातो कणकण
प्रकाश देण्या तुला कवळण्या
हाजीर राणी तनमन

असे तीक्ष्ण तीर नको चालवू
घायाळ मी जायबंदी
एक जखम ना भरते तोवर
पापणी आड मी बंदी

मोजू पापण्या रेखीव सुंदर
की मी डुंबू दे नयनी
एक नजर ती मला छेदते
तुला गर्व तू सुनयनी

जळतो दिव्यासम संपवून मज
तेज तुझेच हे मोही
डोळ्याधल्या दोन ज्योतींच्या
प्रेमात पडतो मीही

त्या ओठांच्या धुंद पाकळ्या
कधी नशिबी येतील
मलाच त्यांच्यासवे प्रदेशी
सुधामृताच्या नेतील

रुळते बट ही चेहऱ्यावरती
हक्क सांगते आपुला
कपाळावरी ऐटीत लटकत
चुंबन घेई कपोला

सुंदर मोहक सरळ नासिका
चेहऱ्याची खुणगाठ
दो भुवयांच्या मधली टिकली
चांदणी शोभे त्यात

जागू न शकतो झोपू न शकतो
जगतो कसे की मरतो
आत तुझ्या तू डोकावून बघ
तुझ्या मनातच उरतो

एकदाच मज आपुला म्हणशील
तुझ्या प्रीत शब्दाने
त्या शब्दातच जगणे माझे
सार्थक शतजन्माने

दि.१८/०५/२१
रात्री १२.३७ वा.



(४३)

**तुजवर आजही भुलला ग**

तीन कळ्या ह्या मोगरीच्या
सहज हाती मी धरल्या ग
तुला पाहता अवचित फुलल्या
मनी भावना खुलल्या ग

तू मी शेजारीच होतो ना
अंगणी माझ्या फुलती फुलं
तू रोज रोजची गुंतून यातून
पाहण्या यायची सारी फुलं

काही कळ्या मग मोगरीच्या
नाजूक हाती खुडायचीस
पुन्हा पुन्हा तू याच फुलांच्या
प्रेमामध्ये पडायचीस

आजंही हाती येई मोगरा
तरळून जातो तुझा चेहरा
प्रफुल्ल ऐशी तू ही सदैव
कधी भेटशील अशी जरा

पुन्हा मनीच्या माझ्या अंगणी
प्रीतमोगरा फुलला ग
तुलाच देण्या बहारपुष्पे
तुजवर आजही भुलला ग

दि.२९/०५/२१
सकाळी ०७.४६ वा.




## (४४)
## स्मृती देखण्या या

येशील चांदव्या रे
मेघात तू लपुनी
पाहशील हळूच ऐसे
प्रेमाने झाकाळुनी

तुला पाहण्याला
ही जागीच झाडे
फुलांचे हे गुच्छ
हाती ताजेतवाणे

खिडकीत माझी
प्रिया एकली ही
निरखंत तुजला
अशी थांबलेली

शीतल तुझी ही
किरणे दिलासी
तुझ्या चांदण्यातील
या रात्री विलासी

तुला पाहुनी मीही
व्याकुळ होतो
प्रियाभेटीला
खेचखेचून जातो

अशा मीलनाच्या
स्मृती देखण्या या
पुनव चांदण्यावर
पुन्हा रेखण्या ह्या

दि.२२/०५/२१
रात्री ११.४६ वा.



## (४५)
## परिमळ सुवर्ण चाफी

हातात सोनचाफा
हृदयात आठवणी
नसते कधी तयार
मन तुझ्या पाठवणी

तो मंद गंध अजुनी
दरवळतो अंतरात
ती सोनप्रीत कवळी
आलेली ना भरात

केसात माळला मी
चाफा मनातला जो
तू धुंद होत गेली
तो भाव आतला जो

तो स्पर्श पहिलावहिला
शहारून अंग गेले
विरघळलो तेव्हा दोघे
चाफ्यास त्या कळाले

हसला नि जवळ केले
त्याने तुला मलाही
स्मरते ती भेट सुरभित
पाहताच चाफ्यालाही

मी आत आत घेतो
परिमळ सुवर्ण चाफी
आठवता भेट आपुली
येते तू बाहुपाशी

अधरांसी चुंबीण्याला
होतो अधीर मीही
लाजून चाफा चूर
क्षण मोहणारे काही

दि.३०/०५/२१
सकाळी १०.३६ वा.




## (४६)
## चेहरा की भाग्य माझे

बोलक्या दो नयनांच्या गे
तेवणाऱ्या निरांजनी
त्या प्रकाशी तेजाळतो मी
जरी सावळा ग साजनी

भाव दडती लाखाचे ते
पापण्यांच्या कोंदणी
मिटतो मीही नयन मिटता
प्रियतमे तव लोचनी

कृष्ण भुवयांच्या कमानी
राखणीला सारख्या
त्या तुझ्या लोभस अदांना
नसती कधीही पारख्या

चंद्रालाही केले बंदी
माथी तू त्या सजविले
नथनी म्हणुनी त्यास तू तर
नासिकेवर टांगले

ओष्ठरागाने खुलाव्या
पाकळ्या अधरांतुनी
रंग घेती तेच तुझिया
अमृताच्या रांजणी

चेहरा की भाग्य माझे
दर्पणी मी पाहतो
त्या तुझ्या मुखकांतीवरती
विरघळुनी मी वाहतो

बांध आता बांध की मज
सोड तू प्रिये मुक्तसा
जीवनाचे ध्येय सुंदर
पूर्ण झालो मी असा

दि.११/०६/२१
रात्री ११.०३ वा.



## (४७)
## पावसाळी ही पहाट

चिंब पावसाची वाट
धुंद प्रभातीचा थाट
सांज भास झाकोळले
थेंब सारे विसावले

कोसळून थकले का
नाही खेळले खेळले
थेंब वाट्टेल तसे ते
मुक्तपणे बागडले

वाट जशी ओली झाली
स्वप्ने जागेपणी आली
गंध अत्तरे लेऊन
दरवळा जाग आली

बीज पहुडले होते
प्रीत पांघरून मनी
अलगद अंकुरले
सरी येताच अंगणी

थोडी शिरशिरी येई
अंग चोरते ना भुई
परी गीत मनातले
तिचे रोमरोम गाई

पावसाळी ही पहाट
झोप साखरेची येई
सखी उठविण्या येता
निज गुलाबीच होई

दि.२२/०६/२१
सकाळी ०८.३३ वा.



## (४८)
## अन् हा ऋतू मोहरला

आलीस अशी किती सहजी तू
सुख उधळीत नजरेमधुनी
मी तसाच आहे तिथे थांबलो
बुडलो नयनी अजुनी


किती पुस्तके खुली करावी
तशी तू वदली काही
किती वाचले मीही ग्रंथ
तुजविण स्मरतच नाही

अशी हासली गेली उधळून
फुले लक्ष उमलुनी
माहीत नाही अशी अवेळी
कशी फुलली कमलिनी

तुझे पापण्या अलगद उघडून
तशाच मिटवून घेणे
किती भाव ते शब्देविणही
नजरेतून बोलणे

साक्षी होऊन माझ्या मनी हा
मधूमास बहरला
प्रीत फुलोरा पाहून लाडिक
अन् हा ऋतू मोहरला

दि.२४/०६/२१
सकाळी १०.२१ वा.



## (४९)
## सहवासाचा सुगंध बकुळी

तू बकुळीच्या गजऱ्यासम अशी
घट्ट बिलगुनी राहशील का
नाजूक देही परिमळ लेऊन
स्वर्ग सुखाला देशील का

आत राहू दे धागा कणखर
आपुल्या प्रिय नात्याचा
एक एक गुंफून घेऊ दे
प्रीतभाव ह्दयाचा

मन सुमनाला ओव सारखे
क्षणकुसुमांच्या ओळी
उत्साहाच्या खुलू दे पाकळ्या
खुदकन हासू गाली

झाला का बघ गुंफून गजरा
पुन्हा नव्याने घ्यावा
सहवासाचा सुगंध बकुळी
ओंजळीतुनी प्यावा

अशा टवटवीत फुलपाकळ्या
परी बांधणी नाजुकशी
अशीच मिळू दे सखी बकुळीवत
हळुवार साजुकशी

दि.२३/१/२१
सकाळी ०६.३२ वा.



तुझ्या कुंतली अन् बिंदीतून
श्वास माझे बघ अडखळती
तुझ्या भाळीच्या रेषांमधुनी
भाग्यशलाका खळखळती

## (५०)
## कसा विसरू मी तुला प्रिये ग

नजर खिळली गं चेहऱ्यावरी
कसे सावरू सांग प्रिये
उघड्या नयनी तूच दिसे मज
मिटून लोचने स्वप्नं तुझे

त्या डोळ्यातून प्रीत सांडते
प्राजक्ताचा सडा पडे
अन ओठांतून अबोल तरीही
गीत मनातील उलगडते

अशी झुकविली नजर जरी तू
मी घायाळचि होत असे
असा खेचला जातो तुजकडे
भान कशाचे नच उरते

ते कानातील लांब लोंबते
झुले मला बघ कसे झुलवी
तुझ्या गालाच्या रम्य खळीतून
सुंदरताही मज खुणवी

अशी हनुवटी किती गोमटी
सरळ नासिका चाफेकळी
त्या भुवयांच्या अशा कमानी
कमाल करती मुखकमली

कसा विसरू मी तुला प्रिये ग
विसरून गेलो मीच मला
नको विसरू तू अशा राजसा
जीवापाड जो जपेन तुला

दि.१३/०७/२१
दुपारी ०४.५४ वा.



## (५१)
## म्हणून जीव वेडा तुझ्या त्या अदांनी

उमलती कुठे मोगरे आठवांचे
कुणाला तरी गजरे ते पाठवायचे

ते गंधाळले ओघळती क्षण सुखाचे
मना अजय छळती किती ते फुकाचे

कधी मोगऱ्या संग गजऱ्यात मरवा
कधी भेटीचा लाभतो धुंद गारवा

तू होशी अबोली बिलगता मला ग
गालावरी रंग लज्जा खुलला ग

असे पाहुनी गजरे मी वेगळाले
कळीचे तुझे पुष्प होणे कळाले

ते गंध माझ्या उराशी प्रकटले
जेव्हा तुझे माझे क्षण एकवटले

तनु नाजुकी प्रिये गजऱ्यात दिसणे
प्रणयी तुझे लाजुनी मधुर हसणे

म्हणून जीव वेडा तुझ्या त्या अदांनी
फुले साथ करिती तुला त्या मदांनी

दि.१७/०६/२०२२
सकाळी ०७.४२ वा.



## (५२)
## तुझा गंध माझ्या गे श्वासी उरावा

तू ऽऽ मीऽऽ असे जवळी जवळी बसू
चांदणे मंद्र थोडे... निशागाली हसू

तुझा हात माझ्या, असा हाती यावा
मनाच्या खुशीला न थारा असावा

ते दोन प्रेमिक नि सांऽऽज निवांत
मनातून तृप्ती, ऐसा लाभे एकांत

ते बघ चमकले तिथे दोन तारे
भवताल वाहतील मदनाचे वारे

तू टेकवावे तुझ्या भावनांना
निश्चिंत होऊन अलवार त्यांना

अशा गाठीभेटी हृदय कोंदणी ग
शशीच्या मनी रोहिणी चांदणी ग

ते स्पर्श मी रेशमाचे जपावे
तुला राणी हे प्रेम माझे पटावे

नको ग कधीही पुन्हा हा दुरावा
तुझा गंध माझ्या गे श्वासी उरावा
तुझा गंध माझ्या गे श्वासी उरावा

दि.१९/०६/२०२२
रात्री ०९.४३ वा.




## (५३)
## गूज आपुले पाऊस होणे

ओल्या चिंब तुझ्या हाका त्या
मनास माझ्या करिती चिंब
तू भिजलेली निथळ चांदणी
हृदयी प्रीतीचे फुलले बिंब

केशकुंतले थेंब झाडीती
कंकण ओले राग छेडीती
कर्णफुले ओथंबून लोलक
मोत्यांची बरसातही करिती

वस्त्रावरती नदी उतावीळ
जणू सागरासाठी वहाते
मेघांचे ते दान घेऊनी
वर्षाराणी भुईवर येते

त्या अधरांवर थेंब दवाचे
मनास माझ्या उलथून देती
किती राखिले मर्यादेने
सीमा उल्लंघून ते जाती

अशा पावसाळ्यातील सखये
तुझे मुक्त ते भिजून नाचणे
ओल्या ओल्या प्राजक्ताच्या
गंधाला श्वासातून वेचणे

तुझ्या ओलसर घट्ट मिठीतून
कधी न मी बघ विलग हा व्हावा
तुझ्याच सोबत पाऊस वेडा
वेडा हा तव प्रियकर व्हावा

चार मास भारावून जाणे
पावसातले ओले गाणे
तू मी दोघे आणिक पाऊस
गूज आपुले पाऊस होणे

दि.०६/०७/२०२२
सकाळी १०.४४ वा.



## (५४)
## झुळूक बनुनी वाहतो

का अशी बघतेस स्वप्ने
बोलक्या डोळ्यांतुनी
खोलवर रुजूनी सखे ग
उमलते तू आतुनी

काजळाच्या दोन रेघा
दाटसर तू रेखिल्या
भुवया वरती ऐटीने बघ
अर्धगोली वाकल्या

पापण्या दारावरी तू
राखणीला ठेविल्या
पाखरे बुबुळे ग भिरभिर
मज प्रतिमा गोवल्या

दो बटा रुळती त्या लटकून
जीव टांगणी लागतो
तरीही नेहमी संयमाने
मी तुझ्याशी वागतो

कंच हिरव्या काचेच्या
खळखळती साध्या बांगड्या
ठेव जपुनी राणी जाणती
मज मना त्या रांगड्या

डूल कानातील थकले
हलुनी वाऱ्यावर सदा
तेही जाणती मी किती ग
तुज अदांवर हा फिदा

भाळी सजलेली ही टिकली
रोखुनी मज पाहते
वाट बघणे जीवघेणे
ती तुझ्यासवे साहते

पिवळी कवळी लाजवंती
लाजली शेवंती ही
धीट धिटुल्या त्या बटांवर
बांधली शेवंती ती

जवळी येतो तरीही तुजला
चोरूनी मी पाहतो
टेकलेल्या चेहऱ्यावर
झुळूक बनुनी वाहतो

दि.०४/०९/२१
१०.११ वा.



## (५५)
## जर तू आली असती जीवनी

जर तू आली असती जीवनी
बहरे प्राजक्तांगणी
अन बकुळी फुलली असती
एकदाच दोघा मनी

रोजची मग चांदणे
आलेच असते ओंजळी
मंजुभाषी शब्द मधुरा
दल खुले मन पाकळी

रूप गुण प्रज्ञा प्रतिभा
अन्नपूर्णा रांधली
तूच लक्ष्मी शारदाही
असती मज गृही नांदली

मी असा भुललोच असतो
क्षणक्षणी तू साजिरी
मी तुला निरखून पाहत
राहिलो तशी गोजिरी

ते नवेपण कधी न संपे
तू नवी नित मानिनी
मजला हवी होती तशी तू
आजही गं कामिनी

भोवताली मी तुझ्या
असतो सततचि राहिलो
नकळता तुज सारखा
मी न्याहाळून ग पाहिलो

तू अशी मनमोहिनी
रती सुंदरी अनुगामिनी
अर्थ मजला लाभला
असता तू जर मज स्वामिनी

दि.१२/०८/२१
रात्री ०९.५७ ,वा.



## (५६)
## अशी गावची छोरी गोरी

वय सोळावे तियेचे असे
लाज तरुण जाहली
चाळा चालतो ओढणीसंगे
मनी प्रीत जागली

डोळ्यातून ती झळकून गेली
तिच्या मुखी विलसली
कुण्या भाग्यवंतांच्या ह्दयी
तिची आस उमलली

रानवारा जो करितो गुंजन
झुकलेला मुखडाही
फिका वाटतो तिच्या पुढती तो
चांदव्याचा तुकडाही

नसे माहिति शृंगाराची
साधी राहणी तिची
फुले उधळती सुगंध पायी
मादक पाहणी तिची

कधी न विसरेन तिला जन्मी या
न बोलता बोलणे
अजून भाळतो तिच्या अदांवर
तिच्या गावी चालणे

अशी गावची छोरी गोरी
पोरी चोरूनी गेली
एकच होते काळीज धडधड
सदा पेरुनी गेली

दि.०८/०१/२०२३
रात्री.१०.३१ वा.



**(५७)**

**माझा म्हण गे मजला**

एक चेहरा रुळतो आहे
मनी कधीचा वेडा
कितीही म्हटले विसरून जावे
तरीही त्याचा गराडा

साधा साधा चंद्र वाटतो
गगनातुन फिरणारा
अमोल त्याचे किती चांदणे
आल्हादी उरणारा

डोळे निरागस भाव कोवळे
मुखी भावना दाटून
कधी स्वप्नांचा घेऊन मेळा
हाती ये माझा वाटून

तोच चेहरा दिसे पुन्हा मज
तरळून जातो कधीही
बट ती वेडी करते पागल
आजही आणि आधीही

अधरांवरती तिच्या अबोली
तरीही खुलते काही
सांगा कसे मी विसरू डुल ते
मजला विसरत नाही

इवली नाजूक टिकली टिकली
दो भुवयांच्या मध्ये
हसू की नको जणू विचारे
हृदय संभ्रमामध्ये

काय सांगू मी प्रिये तुला बघ
घायाळ आजही पुरता
सखे विचारून भंडावती मज
कृश तू कैसा न झुरता

कधी एकदा नजर भिडावी
काळीज कळू दे तुजला
अलगद माझ्या मनात यावीस
माझा म्हण गे मजला

दि. ०८/०१/२०२३
रात्री १०.१६ वा.

## (५८)
## घोट सुधेचे

जिने पाजवले घोट सुधेचे
मदिरा निराळी होती
नजरेमधुनी प्याले भरूनी
ती देत सुराळी होती

मदिराक्षी सुंदर की मदिरा
कधीच कळले नाही
प्याले नयनही दोन्ही होते
अक्षय रसभर काही

चैन नसे या जीवास कोठे
त्या डोळ्यांची सवय जाहली
नयनमदिरा आठही प्रहरी
पिण्यास आदत उगाच जडली

ती दाता देणारी अखंडित
मी हो दास सदोदित पाही
वेड लागले वेद वाचले
तिच्याच नयनी काव्यही काही

रोजचेच ते असे वागणे
त्या नेत्रांचे वार देखणे
अजूनही मी त्याच स्मृतीने
झिंगाळुन डोळ्यात हरखणे

सवय लावली कधी न सुटली
साथ तिची ती कधीच तुटली
रसिक कुणी तो गेला घेऊन
समोर माझ्या सालस प्याली

साथ दिली ती उगाच का गं
रोज नशिले सागर ते गं
मी बुडालो खोल खोल अन्
सोडून मध्यावर गेलीस गं

आजही बुडतो आहे त्यातच
तूच बदलला साथी तशातच
राग तुझ्यावर करू न शकलो
अनुरागाची सरिता दिलातंच

दि.५/१/२०२०
सकाळी ८.३४ वा.

## (५९)
## किती प्रसन्न

किती प्रसन्न, किती उत्साही
तंदुरुस्त मी असतो
तुझ्या हास्याची जादू ऐशी मी
आरोग्यवान ही दिसतो

तुझे स्मित, तुझे खळखळणे
तुझे मंद हास्य गाली खुले
इकडे माझे स्वास्थ्य बहरते
जगणे होते मोकळे

ताणही नाही नाही तणाव
हास्यगोलिका त्याचे नाव
रोज हे औषध लागे मजला
असर त्याचा होतसे लगाव

तू हसते अन् दिलात काही
औषधी गुणधर्माचे स्राव
अवयव सारे नांदू लागती
गुण्यागोविंदाने हा प्रभाव

एक अनामिक लहर कुठूनशी
कुंडलिनी जणू जागवते
तुझ्या हास्याच्या ध्यानामध्ये
योगीपण मज लाभवते

आनंदाचे अष्टचक्र बघ
त्यामुळेच गरगर फिरते
आता मी स्वामी तूच स्वामिनी ।
प्रेमच प्रेम इथे उरते

तुझ्या मुखी हे हास्य वसावे
धडपडीन मी आजन्म
तुझ्या हास्याच्या मोत्यांमधुनी
मी पुन्हा पुन्हा यौवनलग्न

लोक मला पाहती विचारून
मात्रा कोणती गवसली
मी हसतो अन् इतकेच बोलतो
ती पहा तिथे गाली हसली

दि.१४/०१/२०२०
रात्री ८.३३ वा.

## (६०)
## शेजारीण सौंदर्यवती

मी चहात साखर टाकत नाही
तिला पाहुनी भुरके मारतो
शेजारीण सौंदर्यवती जी
निखळ तिच्या हास्यावर मरतो

मी मनाच्या सज्जावरती
तिच्या अदांना सजवीत जातो
ती डोकावत सदा राहते
मी बंद दाराआड तिलाच पाहतो

बाल्कनीतला झुलाही झुलतो
तिच्या बटांच्या इशाऱ्यावरी
मीही कधीतरी बसतो त्यावर
मनास पाठवतो तिच्या घरी

ती हसते अन् एक सरिता
खळखळ खळखळ वाहत येते
होडी नसतानाही मजला
तरंगीत बघ लहरी नेते

तिची कुंडले मनास माझ्या
अडकवून त्यात हलवत राहती
तीही दुरूनच होत साजरी
मदनकटाक्षे झुलवत राहती

त्या ओठांनी शब्दही नाही
कधीच बोलून दाखवला जरी
उगाच लाडिक हालचालींनी
भरते उरातून वरचेवरी

मी रोज एवढा गोड वागतसे
पत्नी अचंबित होत विचारे
कसे काय तुम्ही मधुर एवढे
रोजची होता कारण न कळे

काय जाहले कळे न तिजला
घेऊन गेली वैद्य समीप
काय शर्करा अधिक भक्षिता
मधुररोग वाढतो अमीप

बुचकळ्यात ती अधिकच पडली
म्हणाली साखर चहात न पडली
दुसरेही मिष्टान्न वर्ज्य ते
तरीही साखर कशी वाढली

काळजी ती करून थकली
मनात चिंता उगाच सुकली
मला मात्र शेजारीण मात्रा
अनावर होऊन मनी बसली

किती ठरवतो नको पाहणे
तिचे लाजणे, हसणे, बसणे
तरीही वढाळ या मनास नाही
पसंत दुर्लक्षित तिज करणे

म्हटले वाढू दे कितीही शर्करा
मधुर रसाची मधुर सुंदरा
रोज तिला मी प्राशित असतो
या नयनातून उगा भरभरा

गोड तिच्या या हास्यकळा
हृदयी चमकते चंद्रकळा
विराण बागा बहरून येती
हिरवा होतो रोजची मळा

दि.२०/०१/२०२०
सकाळी९.५३ वा.

## (६१)
## तू किती खास

तू किती खास गं मजला
कसे सांगू प्रिये मी तुजला
जगण्याचे कारण श्वास
त्यामधून तुझाच वास

दरवेळी दरवळतो की
स्वर्गीय सुगंध हवासा
मी चोहीकडे पाहतो
तो तुझ्यातून वाहता

श्वासासवे तू येते
नवजीवनाला देते
जातेस जेव्हा इथुनी
दाह देती उसासे

या प्राणांनाही जडावी
तुझीच लाडिक सवय
तगही धरावा त्यांनी
काढीत तुझीच ती सय

तो श्वास जसा असतो ना
डोळ्यांना ना दिसतो ना
तू जरी सामोरी नसलीस
असण्याचा भाव असतो ना

तू राहा कुठेही राणी
जगण्याची अत्तरदाणी
त्यातील तो परिमळ वेडा
सोहळे न राहे विराणी

कुणी पाहते तू ना जवळी
मजला केवळ ती जाणीव
तू आत राहते माझ्या
जगताला राहो नेणीव

हा देह इथे संपेल
ना तुझी न माझी कहाणी
आत्मतत्त्व तू होता
मी मुक्तिपदाचा धनी

दि.१५/०१/२०२०
सायं ५.५२ वा

## (६२)
## दोन पाकळ्या

दोन पाकळ्या दोन करांच्या
मुखावर झाकल्या
लज्जेने त्या बटाही साऱ्या
हळूच खाली वाकल्या

तुझे लाजणे, छपून हासणे
दडवत त्या भावांना
अन् खलास करणे क्षणात सारे
संयम सांभाळताना

हात कसे मी हातात घेऊ
कवाड ऐसे अलगद उगडू
तू लाजाळू मुलखाची अन्
मीही लागतो उगा लडखडू

बोटामधली तुझी अंगठी
धीर जरा धरण्यास सांगती
दहा बोटांच्या किलकील रेषा
हळूच तुला बघ चोरून पाहती

जरी मिटले तू डोळे राणी
ऐकू येते मज मनात गाणी
तू माझ्या हृदयाची वेडे
कधीच झालेली सम्राज्ञी

अजूनही मी थरथरतो गं
नाजूक स्पर्शासी झुरतो गं
काय मुलायम मल्मल रेशीम
विरघळून मी असा उरतो गं

नयने उघडून बघशील मजला
स्वप्न मीलनी पाहून घेतो
तूही तिकडे स्वप्नामध्ये
राजकुमार मी होऊन जातो

तुझ्या अदांची उपमा नाही
नाही नजर ना शब्दही ऐसे
डोळे उघडे असू दे अथवा
मिटून तयांचे प्रेम सांगणे

ही मूर्त तुझी मी साठवतो बघ
क्षणोक्षणी मग आठवतो बघ
असतो एकटा जेव्हा जेव्हा
खट्याळ मनाला पाठवतो बघ

तू अशीच लाजूनी उभी रहा
ते थांबेल युगेयुगे ही
एकवार तुज पाहून येईल
घेईल जन्म नवेही

दि.११/०५/२०२०
सायं ७.१३ वा.

## (६३)
## मदनबाण तव

नको चालवू मदनबाण तव
कलिका कलिका धारदार
टोक टोकते हृदया माझ्या
तू तर वरवर नाजूक फार

पुष्प बनून तू येशी जीवनी
कलिका असता मनमोहा
तुला पाहता गुंगून गेलो
सौंदर्याची धार अहा

फुलतील जेथे मदनबाण हे
गंधाचे अत्तर फेकून
स्पर्शासाठी आसुसतो मी
मदन उभा शर तेव्हा साधून

कसले हे तव सरसर शरशर
विदीर्ण करती हृदयाचे घर
मदना मारीशी मदनबाण पण
जखम ना दिसते किंचितही वर

मी तळमळतो आत किती रे
औषध देशी गोड सामोरी
इतके नाजूक फूल असूनही
तू तर धनुषी नेम साधीशी

कळी सांगते प्रेमधार अन्
घुसते चिरते हृदयाला तर
उमलून येता अशा पाकळ्या
बाण टोचती अजून खोलवर

काढू न शकतो शल्य बाहेरी
जपणे मजला नित्य अंतरी
ती मज दिसते गंधासारखी
टोकफुलावर बसून पारखी

तुझे जाळणे जाळी मजला
कसे सांगू मी सांग कुणाला
मदनबाण कुसुमेही येती
तिची आठवे अन् संगतीला

जीव तळमळे पाहून हसशी
हेतू सारे पुरवून बसशी
तिलाही मारत जा ना एखादा
शर वेड्या तू गुंतून बसशी

अरे राजसा, जी बाण ओजसा
मीच होऊनि घायाळ वसंती
बाण कसा मारील बाणाला
कोमल तव हृदयाची पसंती

कामच माझे कामनिर्मिती
फुले निवडली त्यास्तव थोडी
इतके नाजूक बाण मारूनी
वेदनेची मी देतो गोडी

मी घेतो तव बाण उरी हे
ती हृदयाशी बिलगून जावी
मार कितीही शरांस मदना
इच्छा एवढी पुरवून द्यावी

दि.१२/०५ /२०२०
पहाटे ४.५१ वा.

## (६४)
## तू स्वप्न की

तू स्वप्न असशी की, खरी जन्मली
कुठेतरी मज सांग ना
जसे देखिले चित्र मंदिरी
मनातल्या तू तशीच ना

की आहेस तू भास गोडवा
अमृत झरते मुखी पौर्णिमा
मी चातक अन् चकोर वेडा
जन्मोजन्मीचा तृषार्त केवढा

अथवा माझी असशी कल्पना
मी ब्रह्मा अन् निर्मितो ललना
युगायुगांची फळते तपस्या
घडते तू सापडते नयना

का आहेस तू मूर्त दिलाची
रसिक अशा मज कलाकाराची
जे जे जैसे घडवीत गेलो
परिणती तू त्या कष्टाची

एक यती मी तपस्वी आणिक
हठयोगी की साधक मानीन
दैवत होतीस अंत:करणी
आतूनच तुज शोधून आणीन

तू न मिळाली, आशा उरली
तरी जगेन मी तुझ्याचसाठी
तळमळ तळमळ करीत मासळी
जगण्यासाठी जीवन पाही

या नयनांतून याच मनातून
तना कणातून अणूरेणुतून
तूच व्यापशी आतबाहेरी
शृंगारातून, अध्यात्मातून

तुला पाहता जाणीव होते
मिथ्या सारे जग हे वाटते
केवळ एकच तत्त्व सत्य हे
रूप तुझे सगुणनिर्गुण होते

दि.१३/०५/२०२०
रात्री ९.३० वा.

## (६५)
## होत ओढणी

अशी ओढलीस ओढ ओढणी
तेजमुखाच्या भवताली
आणिक मजला पाहून गेलीस
प्रेमकटाक्षे त्या वेळी

अजून गुंतलो आहे प्रियसखी
तुझ्याच धाग्याधाग्यातून
खडी, नक्षी ती सुंदर होती
मी गुंफून स्वत: कशिद्यातून

किनार झालो, थेंब चांदणी
रेशीम कशिदा मी झालो
ओढणीतला धागा धागा
होऊन रंगी त्या न्हालो

तुझ्या रूपाच्या भवतालीने
फिरून गुंडाळून स्वत:
जवळ आलो स्पर्शाने तव
काटा फुलला खडी पहा

नको नजर ती लागो कुणाची
जपेन तुज मी होत ओढणी
लाजून येशील मस्तकी धरशील
नजरभेट मग क्षणोक्षणी

तुझी नाजूकशी अलगद बोटे
मजला तेव्हा धीर देतील
घसरून पडणाऱ्या प्रत्येका
सांग कशी ती सावरतील

तव हृदयाची जाणून धडधड
पडदा ओढणी बनलो आहे
अशा लाडक्या प्रियतमेसाठी
शालीनता मी झालो आहे

दि.१४/०५/२०२०
पहाटे ४.४७ वा.

## (६६)
## जिंकलो मी जिंकलो

जिंकलो मी जिंकलो
डोळ्यात तुझिया जिंकलो
तू अशी पाहून बोलली
सर्वस्व तव मी जाहलो

प्रेम ते नजरेत केवढे
जीव माझा गुंतला
तू मला देऊन तुजला
अर्थ सुंदर दर्शीला

हासलीस विश्वास दिसला
तो तुझा माझ्यावरी
रूप वधूचे देखणे किती
कल्लोळ उठती हे उरी

थोडे ते तरळून गेले
पाणी जे नेत्रातुनी
काळजी नसू दे मनी बघ
जपेन तुजला अंतरातुनी

नाही मी देणार अंतर
तूच माझे जीवन
सारे प्रिय त्यागून आलीस
लाडक्यांना सोडून

मी किती बघ भाग्यवान
तू रूप सुंदर रेखीणी
विष्णूने वरिली जशी तू
दिसशी मनोरम मोहिनी

चमकू दे भाळी टिळा तो
गजरा राहू दे तवाना
बिंदी झुमके नथनी कंगना
रत्नांच्या हारात चांदण्या

रूप हे मी साठवून नित
ओंजळीत ठेवेन गं
त्यात सुखकलिकांस भरूनी
हास्य तव कायम जपेन गं

मी तुझ्या डोळ्यात राहीन
बोलशील तू दृष्टीने
मी करीन आराधना तव
प्रेम आणिक भक्तीने

दि.१५/०५/२०२०
दुपारी २.२१ वा

## (६७)
## रूसलीस ना

रूसलीस ना दिसतेस छान
म्हणून मी तुला मनवतंच नाही
सांग ना यातून तुला माझं प्रेम
खरंच का कधी जाणवतंच नाही

तुझे डोळे होतात लालेलाल
नाकंही लाल लालबुंद
श्वासांचे भाते झपाझप खालीवर
तुझं विचार करणं पूर्ण बंद

ओठ इतके छान फुरफुरतात
तुझ्याशी एकनिष्ठ राहून कुरकुरतात
दातांची ओठांची खाण्याची स्पर्धा
माझा जीव इकडं तुझ्यासाठी अर्धामुर्धा

सगळा चेहराच तुझा मार्तंड होतो
वेळीअवेळी मध्यान्हीला झेलतो
करपून जाशील राणी नको
नको एवढा राग गं, मी रागाने होरपळतो

जे काय रागारागाने पुटपुटतेस जेव्हा
माझ्या स्तुतीचे गाणे समजून
ऐकून घेतो तेव्हा
तू अशी रूसतेस ना हक्काने माझ्यावर
तशी कुणावरंच नाही, नाहीच कुणावर

जेवढी तळमळून राग सारा दाखवतेस
थोड्याच वेळात माझा हात हाती
घेऊन म्हणतेस
का असं वागतोस रे समजून घेत जा
ना मला
कोणीच नाही हक्काचं तुझ्याविना
समजत नाही का तुला

तूच जेव्हा परक्यासारखा तोडून कधी
वागतोस
जीव माझा सारा सारा मोडून कधी
टाकतोस
रूसत असले वरवर तरी आत गोड
झरा आहे
तुझ्यासाठी पाझरणारा प्रेमस्रोत
खरा आहे

दि.१६/०५/२०२०
दुपारी १.५७ वा.

## (६८)
## प्रेमजल

तू वयाला वय दिलाचे
जोडू नको
त्याचसाठी राणी मजला
तोडू नको

कोणत्याही वळणी असते
प्रीत ही जरूरीच ना
नाही हे जरूरी की मी गं
तरुण की हा पोक्त ना

या दिलाला काय माहीत
वाढणे घटणे कसे
त्यास तर ठाऊक केवळ
प्रीतीचे ते तव ठसे

वय ना शिवते मानसाला
माणसाला ग्रासते
हृदय असते चिरतरुणंच
प्रेम त्यातंच राहते

ते धडकते आजही
प्रथम तुज पाहता जसे
त्यास तू असता समीप ना
चिंता कसलीही नसे

तू कशाची करिशी चिंता
व्यर्थ वेडे सोड ना
आजही मी सांगतो तुज
मी तसाच गं जाण ना

वय असू दे कोणतेही
जिंदादिल असणे जरूरी
असती मुर्दादिल ही पोरं
प्रेमकहाणी ती अधुरी

दिल इथे कायम वयातच
प्रेयसी तुजजैसी असता
सुंदर कारण जगण्याचे मज
तुझ्यातच बघ असे गवसता

प्रेम ताजे अन् तवाणे
नित्य माझे राहणार
या वयाची ऐसीतैशी
चैतन्य ऐसे वाहणार

काळजी नसू दे कशाची
प्रेम तरुणंच आहे बघ
हा घडा प्रीतिफुलांनी
तुडुंब भरूनच आहे बघ

दिल रसिक, मीही रसिक
तू रसिकपोषीनी सर्वदा
कोसळून पडणार कायम
प्रेमजल मज धबधबा

दि.१७/०५/२०२०
दुपारी ४.१३ वा

## (६९)
## **स्मृतीपारणे**

आठवते का प्रिये तुला हे
बाहेर आपुले जाणे फिरणे
तुझे वेगळे रूप अनोखे
वेगळेच ते सजणे सवरणे

केसांना सोडून मोकळे
तुही त्यांसवे हुंदडशी
अल्लड होऊन पुन्हा जराशी
पाखरासवे बागडशी

फुलपाखरू होऊन थोडी
मधकण क्षण क्षण साठवशी
आपुले सुंदर आवडते क्षण
क्षणोक्षणी मग आठवशी

त्या रानामध्ये डोंगरावरी
फुले पसरल्या पठारावरी
तूच होऊनी वारा सरसर
टाकत जाशी पाऊले खरी

कुठे रंगुनी जाशी क्षणभर
कुठे दंगुनी तासन् तास
कुठे चढून तर कुठे उतरून तू
कुठे बसून गालातून हास

किती आवडे निसर्ग तुजला
प्रसन्न होशील मन बहरेल
तुझ्याही नकळत तुझी ओढणी
अवखळ वाऱ्यावर लहरेल

तुझीच ओळख होत नव्याने
मी तो तो घायाळ प्रेमाने
तुझे लाजणे, तुझे कटाक्ष
साडीला सांभाळून लाडाने

अधूनमधून अशी करू भ्रमंती
फुलेल मन जाईजुई शेवंती
रूप नव्याने अनुभवाला
तूच बेधडक अन् लाजवंती

सारे सारे तुझे बहरणे
आणिक रूप तुझे ते लहरणे
मी चित्रातच साठवून गं
जपून ठेवीन स्मृतीपारणे

दि.२१/०५/२०२०
दुपारी ४.१७ वा.

## (७०)
## अशी रूपगोडी

अशी रूपगोडी
तुझी माझी जोडी
प्रथम पाहिले मन
कधीही न सोडी

मी तुला पाहिले
तू मला देखिले
क्षण मी तिथे
कायम रेखिले

तू अजूनही
आहेस तशीच
मीही तुझ्यातच
गढलेला राहीन

कसे विसरू ते
हास्य लाडिक भोळे
प्रेमाचा सागर
साठवती डोळे

तो एक फोटो
अजून ठेवलेला
लपवून मीही
सांभाळलेला

वाटे मला ना
तुला साठवावे
मनाला तुझ्याच
कडे पाठवावे

हळूच काढतो मी
तुझा हाच फोटो
दिलाशी धरून
त्यास आधार देतो

अजून सांगतो
कानी यातून तुझिया
संजीवनी तूच
हृदयास माझ्या

ही ऐशी छबी
घुसली रुबाबी
प्रिया लाजवाब
नजर हजरजबाबी

दि.२१/०५/२०२०
सायं ७.२४ वा.

## (७१)
## जाणणे सोपे

ही तुझी मुद्रा मी नित
आठवून बघतो गे प्रिये
तू शांत, केवढी बोलकी
शब्दांतुनी, शब्दांविणे

झुकली की दमली तुझी ती
सांग लोचनपाखरे
एक नजरी बोलणारी
दिव्य प्रेमळ अक्षरे

तू अशी प्रेमात बुडुनी
पाहशी अवनी जरा
गांगरून जाईल वेडी
प्रेमसरिते ही धरा

तू अशी जरी गप्प असशी
साद ऐकत राही मी
चेहरा हा बोलका तव
ग्रंथ सारे रचशी की

जवळुनी वाचून घेईन
रोमरोमीची कथा
सुख तुला देईन भरूनी
दे मला साऱ्या व्यथा

तू हसावी साथ द्यावी
जीवनाला वाहण्या
ओठी असू दे स्मित सदैव
मी सुखी गे राहण्या

केवढी तू गूढ आणिक
तेवढीच साधी सरळ
जाणणे सोपे तुला प्रेम
हृदयी असता हे निखळ

दि.२१/०५/२०२०
सकाळी ७.२१ वा.

## (७२)
## तू ये ना एकदा सखी

भरून आलेल्या आभाळासारखी
तू ये ना एकदा सखी
मी चातक वेडा होईन
अधाशासारखा तुला पिऊन घेईन

तू बरस सरीवर सरी
साचवून ठेवलेलं प्रेम जे उरी
मी चिंब होईन त्यात इतुका
तूही भिजवून बावरी

कशाला मनात साठवायचं
प्रीतीच्या पावसात भेटायचं
तो ओलावा पार मनात झिरपत जाईल
आठवेल तेव्हा तेव्हा आपल्यालाच
झिंगेत घेऊन जाईल

मला आवडेल तुझं
वेळी अवेळी येणं
काळी अवकाळी बरसणं
संपवून टाकत माझं तरसणं

कधी तू वळवाची सर हो
कधी पहिल्या पावसाची आस हो
कधी वर्षेची दूत हो
कधी अंदाज चुकवत येती हो

भरून येतं जेव्हा माझं मन
तू वसुंधरा गंधित हो
मी बरसेन कदाचित तुफान होत
तू हळुवार स्पंदित हो

मग पुन्हा तू भरून मन
बरसण्यास आतुर हो
मी ओलाचिंब होईन
भले जग सारं फितूर हो

असे कितीतरी पावसाळे
ऋतुविनाच पाहू दे
मला थेंब होऊन तुझ्या कुशीत
कायमच राहू दे

दि.०३/०७/२०२०
सकाळी ०८.५३ वा.

## (७३)
## मनभाविनी

तू सुंदरी मनभाविनी
रागिणी अनुरागिनी
कोण तू मज सांग ना
की कवीची कल्पना

तेज झळके चेहऱ्यावर
या जगाचे नाही हे
रूप हे अवचित असे की
पुण्य कुठले काही हे

हास्य हे मधुराचे सार
गोड हे अलवार वार
यावे मज वाटे समीप
प्रेम सांगावे अमीप

या बटा मज झुलविणाऱ्या
मीही झुलतो जाणुनी
मी तुझ्या स्वप्नात रंगे
तुजला आपुली मानुनी

अधिक ते मी काय बोलू
मूक माझ्या भावना
तू मला स्वीकार सखये
मागणे मग काही ना

दि.२२/०६/२०२०
सायं ०७.४१ वा.

## (७४)
## निरखून पाहणे तुज

निरखून पाहणे तुज
ऐसी सजा ही झाली
डोळ्यात चित्र होऊन
तू राहण्यास आली

दिसते मला न काही
तू आणि तूच केवळ
मिटताही लोचने तू
स्वप्नीही रूप सोज्वळ

तो गोडवा सुखावे
रूपास गंध येतो
सुचते तुझ्याविना ना
मम श्वासही धुंद होतो

डोळ्यात पाहशील का
माझ्या स्वत:स सखये
क्षणभर नजर टाकून
दे सागरा उधाणे

राहीन याच नेत्री
जगणे गहाण टाकून
तू पाहुणी तरी हो
ये एकदाच फिरकून

दि.०२/०९/२०२०
सायं ०५.५५ वा.

## (७५)
## येतेस सांग केव्हा

येतेस सांग केव्हा
भेटावयास मजला
मी थांबविले तर हा
गगनी शशीही थिजला

एवढेच मी वदलो
जणू रोहिणीच ती दिसते
माझी प्रिया बहुतसी
तेजचांदणीपरी हसते

पटकन बघून मजला
म्हणे बोलवून घे तिजला
पाहीन ती सखी तव
प्रियरोहिणीही संगतीला

अंतराळी आमुची ही
जोडी खुलून येते
पाहू दे आज मजला
वसुंधरा का भुलते

भेटून जा प्रिये तू
मनी चांदवा खोळंबे
आकाशी एक वेडा
एक चंद्र येथे विलंबे

दि.१९/०९/२०२०
रात्री १०.३८ वाजता

## (७६)
## मिळताच वेळ थोडा

मिळताच वेळ थोडा
येईन तुझिया घरी मी
करतेस म्हणे चहा तू
गल्लीत गंध जाई

कोणास ठाऊक काय
टाकून त्यात देशी
पत्ती नि साखरेसह
थोडे मना मिसळशी

प्रेमास ओतप्रोत
टाकून त्यात नीट
ढवळून देशी चव ही
अमृततुल्य अवीट

क्षण गाळतेस कटू तू
वरती तरंगती ते
गाळून देशी पेया
क्षण रंगती असे ते

चहा पीत होई मीही
चाहता तुझा नव्याने
ये ना कधी चहा तू
स्पर्शीत त्याधराने

दि.२६/०९/२०२०
रात्री०८.४३ वा.

## (७७)
## त्या तिच्या शब्दात

ती म्हणाली जाऊ दे मज
रीती साऱ्या पाळण्या
पाळली मी प्रीत वेडी
वचन माझे जागण्या

प्रेमनिष्ठा हीच माझी
ती म्हणे ते ऐकणे
जीवही घेऊन हाती
मृत्यूलाही भिवविणे

ओघळत आसू तियेचे
एकची मज मागती
नाही इच्छा तरीही जाणे
प्रेम हृदया कोंदणी

जन्मदाते ज्यास देती
मजसी तिकडे नांदणे
पण तुला सांगून जाते
तूच मनी मज चांदणे

ती म्हणाली तूच माझा
मन तुझ्याजवळी वसे
देह झाला जरी कुणाचा
मी तुझी आतून असे

प्रीत ना कळते कुणाला
देह केवळ वरवरी
आत्मरूपी रंग भरता
प्रेम चढते अंतरी

मी असे तिज मुक्त केले
बंदी होऊन वचनी ज्या
प्रेम सोबत आजही मज
लाघवी वेळाही त्या

मिटता डोळे ती दिसे मज
कुशीत शिरते लाडकी
लाजणे ते, चोरणे तन
नजर झुकते सारखी

त्या तिच्या शब्दात गुंतून
जन्म वाहीन मी किती
ती म्हणाली वाट पहा मज
थांबलो, थांबेन मी

दि.२३/०९/२०२०
दुपारी ०४.३३ वा.

## (७८)
## सांडले हास्यात मोती

सांडले हास्यात मोती
मोतीयाचे चांदणे
रंगकांती रोहिणीसम
चंद्राला ते भुलविणे

दोन डोळे बोलती गे
तू जरी ना बोलणे
काय हे शर कामदेवे
एकवेळी मारणे

नेम त्याचा ना चुके
वय आमुचे जरी वाढले
वाढल्या ना प्रीतगोष्टी
चित्र मनी तव काढले

ही छबी मनमोकळी
जणू गंध वाहे मोगरा
कृष्ण झालो लाभली ना
राम श्रीयुत जाहला

पाहतो नुसते तिला नित
चित्र कोरून ठेवीले
माधुरीसम गोड हास्य
सांगा कोठे पाहिले

हास्य हे राहो चिरंतन
सुखफुलां ओघळणे
क्षण क्षणी पाहून तुजला
चांदण्या ओशाळणे

दि.०५/१०/२०२०
रात्री ११.२४ वा.

## (७९)
## आत्मिक प्रेम माझे

जे जाणवेल तुजला
आत्मिक प्रेम माझे
बस तेवढेच पळपळ
समजून घे ना वेडे

ऐकून घेशी थोडे
म्हणणे मनातले जे
होशील माझी तूच
आवाज ऐक त्याचे

आहेस रोमारोमी
मी बोलतो न काही
घे स्पंदने टिपून
तुझेच नाव त्याही

असतो अबोल जरी मी
हे नयन बोलती बघ ना
तू झलकते त्यात नेहमी
ना बिंब दूजे पहा ना

क्षणक्षणात श्वासासंगे
तुज आत मी घेत राही
आता न राहिलो माझा
हे तनमन तूच तू पाही

आवाज मनाचा ऐकून
थबकशील जेव्हा थोडी
होशील आपोआप माझी
तेव्हा या जगण्या गोडी

दि.०४/१२/२०२०
स. ११.११ वा.

## (८०)
## गुलबक्षी रंग हा हसतो

गुलबक्षी फुलांची नक्षी
अधरांवर उतरे रंग
कोमलता लेऊन तन्वी
शिरशिरून अंगोपांग

एक रंग गाली कपाली
एक नयनांतून झळकावा
एक नजरेतून झुकताना
लाजमी मनी उमटावा

हा रंग खुणावी मजला
की प्रणयसुखाची नांदी
नाते बहरून हे जाता
दोघांना रेशीम बांधी

ही फुले गडद रंगांची
कोवळ्या मृदुल अंगांची
सय आणून देती सखीची
प्रीतीच्या त्या धुंदीची

हा स्पर्श फुलांचा होता
करस्पर्श जाणवे तोच
थरथरत्या हातांमध्ये
प्रेमाची असते पोच

ती नेत्र उघडते ऐसे
हळुवार दार उघडावे
प्रेमाच्या प्रासादाचे
मी मजले चढून जावे

ती आत सजलेली राणी
गुलबक्षी शालू रेशमी
त्यावरती मज प्रेमाची
नक्षीही कोरून झाली

तो रंग मीच झालो ना
ती रंगांवरती स्वार
जगण्याच्या रंगीत चाली
ती नाजुक चाले नार

ही फुले गुलाबी गर्द
झिंगुनी डोलती पवनी
मी भरलेले आभाळ
ती आसुसलेली धरणी

हा रंग नभाला भिडतो
कुशीमध्ये धरेच्या रुजतो
तिज डोळ्यांमध्ये दिसतो
आम्हा दोघांमध्ये असतो

गुलबक्षी रंग हा हसतो
गुलबक्षी रंग हा हसतो

दि.०४/०१/२०२१
दुपारी १२.११ वा.

(८१)

**बाहुपाशी ये जराशी**

बाहुपाशी ये जराशी
घट्ट बिलगून जा मला
चांदणीला कवेत घेऊन
चंद्र होऊ दे मला

अंग चोरून लाजलाजून
झाली तनु नाजूक कळी
वाटते जणू जाईजुईला
घेतले मी ओंजळी

घातला वेढा करांनी
तूच तुझिया भोवती
कोंदणी त्या ठेव ठेवीशी
लज्जा शीला राखशी

एरवी जे खोड्या करती
ते नयन झुकले बळे
बंद डोळ्यातून मजला
दिसती स्वप्नं सोहळे

तव भ्रूकुटी लीला करूनी
करती मज घायाळ ज्या
आज अगदी शांत चित्री
रेखाव्या असती अशा

ओष्ठ दोन्ही बोलके जे
बंद थरथरती उगा
अमृताचे पान करण्या
आतुर मी गे केवढा

ती हनु गोल सुंदरी
केवढी झुकली खाली
या करांनी उचलुनी तिज
चरम सुख मज शृंगारी

शब्देविण रस बोलती
आनंदभाषा सुंदरी
ही मिठी ही रात्र पूनम
राहू दे सदा अंतरी

दि.२९/०४/२१
रात्री ११.४८ वा.

## (८२)
## हे सूर्यबिंब की

हे सूर्यबिंब की चंद्र हासला
सुमन की आहे फुलले
नयन सुंदरी तुझे गोड किती
जग त्यातच सारे बुडले

निमिषांमध्ये उघडझाप कर
चित्र नवे विणताना
अजीब संवादिनी दृष्टीची
रंग त्यात भरताना

मिटता त्यांना मिटून पाकळ्या
फूलही गोळा होते
उघडताच तू अंगणी सडा
प्राजक्ताचा पडे

असू दे बाहेरी तम हा केवढा
तू उघडून दे प्रकाश थोडा
त्या झोतातंच जन्म उजळू दे
पापणीतही काटेकेवडा

तू निजशील ना तेव्हा यांना
आरामाने स्वप्नी रमू दे
कितीही दूर तू जाऊ दे त्यांना
कितीही वेळ मग तिथे रमू दे

थकशील थोडी विभ्रम करूनि
शीतल जल घे तू सपकारून
दवबिंदूंची माळ लेऊ दे
या नयनांना कडांवरी भरून

राग अनावर होईल जेव्हा
लालबुंद हे होतील तेव्हा
हळूच प्रेमाने मग फिरवून
स्नेहकराने आळव त्यांना

शब्दांवाचून सांगत जाती
तव नयनांच्या उज्ज्वल ज्योती
मीच तुझा हा तेजोदीपक
डोळ्यांमध्ये माझी आकृती

मिचकावून तू त्यांना कधीतरी
काही जेव्हा खुणावशील बघ
असेल तेथून धावत येऊन
चुंबीत नयना करीन नित्यच

या डोळ्यांच्या कोशी राहू दे
बंदी मजला स्वेच्छेने
जन्मभरीचा दासच यांचा
देवाशप्पथ इच्छेने

दि.१५/०५/२०२०
सायं ६.१४ वा.

## (८३)
## तू मराठमोळी

तू मराठमोळी
नाजूक कवळी
मनानं ढवळी
नार शेंग चवळीची

कुड्या कानीच्या
कानी सांगती
गूज मुके ते
गुपित सौंदर्याचे

तुझ्या या नाजूक
गळ्यात बसली
ठसून ठुशी कशी
मधेच हसली

कंठमणी गोल
त्यात ओवला
तुझ्या गळ्याशी
घट्ट जाहला

श्वासा श्वासा
सवे ओळखी
तुझे मनंही
हा मणी पारखी

त्यासवे हृदयी
रुळतो आहे
राणीहार हा
झुलतो आले

मनातल्या त्या
राजासाठी
भावमण्यांची
हारातून दाटी

नथ नाकातील
चमकत जाते
शोभा मुखीची
दमकत जाते

तू केसांचा
पाडी अंबाडा
साधा सरळ गोल
मानेवर त्या

त्यावर गजरे
मोगरी खुलती
कळी कळी मग
उमलून जाती

गंधकळ्यांची
खबर पसरते
वाऱ्यावरती
वार्ता सरते

मग त्या भाळी
भाग्यकपाळी
चंद्रकोर ही
उजळून आली

तुझ्या शुभ्र
हास्याने सारे
सौंदर्याचे
चांदणतारे

दिवसाढवळ्या
पुनव हासते
साडी सुती तरी
तुजवर खुलते

तू अशीच साधी
सुंदर आणिक
माझ्या सुखाची
रत्ने माणिक

असाच मुखडा
चांदण तुकडा
मनात कायम
जडवावा

दि.२५/०५/२०२०
रात्री ९.४८ वा.

## (८४)
## मी न राहिलो माझा

सगळ्यांशी जुडलो आहे जरी मी
तरी बुडलो केवळ तुझ्यामध्ये
मी न राहिलो माझा वेडे
सामावलो मी तुझ्यामध्ये

तुझे हसणे, तुझे बोलणे
अवखळ सारे तुझे वागणे
प्रेमामध्ये सरितेसम तव
झोकून देऊन असे वाहणे

तुझेच सारे शब्द बोलती
भवताली या आसमंती मज
गीत तुझेच हे ऐकू येते
क्षणोक्षणी आतून कुठून मज

नयनांमध्ये कोंडून घेतो
आनंदाने तुझ्या रोज मी
जगतासंगे भांडून घेतो
स्वानंदाने तुझ्यासाठी मी

अशी वेगळी वीण नात्याची
आयुष्याने विणली आहे
राधा कोठे कोठे बाहेर
कृष्णामध्ये भिणली आहे

दि.२४/११/२०२०
०८.५३ वा.

## (८५)
## प्रेम सुंदरसा गुन्हा

प्रेम सुंदरसा गुन्हा
प्रत्येकजण करतो पुन्हा
एक त्याची ही खुबी की
वाट पाहतो जो खरा

प्रेम गहिरे आणि खरे
असले जर अंतरी
वाट पाही प्रेमवीर तो
जीवनाच्या आखरी

त्यास मिळते प्रेम त्याचे
सांगणे हे कठीण आहे
तरीही डोळे त्याच वाटे
पाहताती नित्य वेडे

प्रेम पावन अंतरीचे
समजले जर जोडीदारा
जीवनी नसले तरी जपता मनी
मग काय हवे त्या प्रियकराला

भपके प्रेम जे अंतरातून
कधी न उमटे स्वार्थ तो
जो मनापासून करतो
प्रेम प्रांजळ सार्थ तो

दि.२५/११/२०२०
५.३१ वा.

## (८६)
## राहीन तुझा केवळ

येशील का प्रिये तू
स्वप्नात भेटण्याला
आहे सुदूर मी गं
आतुर भेटण्याला

कायिक भेटणे ना
होईल शक्य माहीत
ते आत्ममीलनही
होईल शक्य माहीत

येशील तू तशीच
अगदी तशीच राणी
साडीत गोड रुपडे
तेव्हा तशीच राणी

तू सत्त्व पाळणारी
पाईक संस्कृतीची
आराधना तुझी ही
परमेश आकृतीची

मी भाळलो तुझ्यावर
की या तुझ्या गुणांवर
मी बुडलो खोल खोल
तरलो तुझ्या गुणांवर

ते हास्य विलसणारे
दुखास लपविता तू
मी हा कितीदा वितळे
दु:खास भोगिता तू

आता तुला सुखी मी
राणी सदैव करणे
डोळ्यातल्या सुखांना
स्वप्नातंही मी जपणे

तुजवीण जात नाही
हा काळ थबकतो ना
भेटेन रोज तुजला
स्वप्नात सांगतो ना

ती भेट नित्य नूतन
देहांनी भेटणेही
मन आत्मरूप भेटे
हे प्रेम वाटणेही

काही न उमजे मजला
तू प्रीत केली कैसी
समजाविलास अर्थ
तू प्रीत दिली ऐसी

आता मी माझा नाही
झालो तुझाच केवळ
ही ओढ वेगळी गं
राहीन तुझा केवळ

दि.०८/०२/२१
रात्री ११.५८ वा.

## (८७)
## वेळीच व्यक्त व्हावे

प्रेम माझे तुझ्यावर
सांगण्या का डरावे
आहे आहे गं प्रीत
वेळीच व्यक्त व्हाव
`

नुसते मनात मांडे
ते कल्पनेचे नसावे
शब्दात सांगण्याचे
हे धैर्यही असावे

का वाटते उगा भय
म्हटले तर नाही म्हणू दे
देईल कुणी नकार
ते भाव तिचे असू दे

मी प्रेम करतो म्हणजे
असणार तिचेही प्रेम
ही भावना चुकीची
जुळतात काही नेम

न सांगताच फुलल्या
गेल्या सुकून वेड्या
या भावना मनीच्या
मजसी का छळती थोड्या

कोणास ठाऊक की
ते प्रेम असेल तेथे
तीही मनात ठेवून
जाईल अन्य कोठे

सांगून टाकणे हे
व्हावे खुशाल मुक्त
आली प्रतिक्रिया तर
व्हावे तिचाच भक्त

नाही म्हणाली जर ती
सोडून द्यावे अलगद
ना राग रुसवा वा
वैरास नाही दाद

कोणीतरी परंतु
असते मनात राहत
ना भेटले तरीही
आतून सारे पाहत

त्या आतल्या प्रियेला
अथवा या सामोरीच्या
सांगून द्यावे सारे
प्रांजळ मनीच्या भावा

दि.०८/०२/२१
सकाळी १०.२३ वा.

## (८८)
## भेट ठरू दे भावमल्मली

जन्म पुरावा कसा सखे गं
अजरामर ती भेट आपुली
रोज वाट मी पाहत असतो
पाहत राहीन साक्ष अबोली

रोज निशी या चमचम चमकत
दमकत येती नभी चांदण्या
तुझ्या आठवांनी मी गुंगून
अंगी झेलतो शीत चांदण्या

असा मी असतो उभा मार्गी अन्
वाट तुला मजजवळी आणील
त्या वाटेवर सडा सुगंधी
प्राजक्ताचा शिंपून जाईल

सारे सारे घडते तैसे
जसे ठरवितो मीही आतून
तुझ्या आगमन उत्सुक साऱ्या
शुभ्र चांदण्या तनमन पसरून

आता शिणले डोळे माझे
त्याही गेल्या बघ कोमेजून
सरली सारी रात्र विरहिणी
विरही तारका गे मंदावून

कधी तू येशील राणी जवळी
भेट ठरू दे भावमल्मली
मंद न होवो प्रीतचांदणे
फुलून येऊ दे वनी शाल्मली

दि.२६/०३/२१
रात्री ११.११ वा.

## (८९)
## प्रेमाचं सुरवंट

अल्लड प्रेमाची
हुल्लड गाणी रं
मनात ठसलीया
दिलकश राणी रं

जिवाची तगमग
पाहण्याची लगबग
आटापिटा रोजचाच चालं
तिचं सपान डोळ्यात आलं

चाल तिची मोहिनी
वय म्या इसरूनी
थोर राधेच्या नादाला लागलो
अन हरखून समदं वागलो

नजरेचं सुख की
पिरतीची भूक ही
झापड पडलीया डोळा न
कसं म्या शब्दात करू हे गोळा

गेली कुठं दूर ती
उडलीया भुर्रर्र ती
जिवाचं वाळवंट झालं
फुलपाखरू ना व्हताच

प्रेमाचं सुरवंट की हो मेलं
फुलपाखरू ना व्हताच
प्रेमाचं सुरवंट की हो मेलं

दि.०२/०४/२१
रात्री ०८.२३ वा.

## (९०)
## का करीशी प्रीत इतुकी

का करीशी प्रीत इतुकी
गुपचूप मनात लपवून
लोकांस वाटते की
कोणी न ह्याचे कोठून

असतो मी एकटाच
गर्दीत हा बुडूनी
नाही कुणीच आपुले
प्रेमात ते पडुनी

तू ठेवतेस मजला
कोंदणी मनी जपून
झुरतेस किती माहीत
मजसाठी प्रिये आतून

दाखव ते भाव प्रकटुन
उत्सुक हा मीही पाहण्या
तोडून बांध सारे
अवखळ नदीस वाहण्या

उजळू दे भाग्य माझे
ये जीवनी प्रिये तू
भर ना वसंत विपिनी
दे प्रीत भेट मज तू

दि.२३/०६/२१
रात्री ११.२८ वा.

## (९१)
## बट हळवी नखरेल

बट हळवी नखरेल तुझी ती
रूळते मनी सुंदरी
हळू वारीशी झटका देऊन
मुरकून वरचेवरी

मला वाटते असा खोडकर
वारा तुज झोंबतो
तुझ्यावरील ते प्रेम सांगण्या
बटीतून लोंबतो

सळसळ सळसळ खेळ बटीचा
लाडिक गाली उडे
अवखळ अवखळ राजस मनी ती
उगाच अडकून पडे

ती खुशीत वेडी अशी लहरते
मनमोकळी विहरते
तुला न ठाऊक किती जणांचे
हृदय तुझ्यावर झुरते

नकोच वारू तिला सावरू
बट हळवी नखरेल
गाऊ दे तिला तुझ्या नि माझ्या
प्रीत गीता सुरेल

दि.०८/०७/२१
सकाळी ०८.११ वा.

## (९२)
## **हसतेस किती गं गोड**

हसतेस किती गं गोड
प्राजक्तसम ते अजोड
लाजतेस प्रिये तू तशीच
नाजूक अन् ते स्वर्गीय

तव स्पर्श असे हा सुगंधी
प्राजक्ताची ही धुंदी
मी होतो ना कायमचा
प्रिये, तुझाच जन्मबंदी

शब्द तुझा हळुवार
वाहे माधुर्याची धार
मनच नाही तेव्हा
भाव माझे अजरामर

तू खरेच मम प्राजक्त
मी नाजूकतेचा भक्त
तू जन्मा गंधित करूनी
उरतेस माझीच फक्त

मी कठोर भुंगा तरीही
होतो अलगद हळुवार
ही प्राजक्ताची किमया
मी शिकार वारंवार

तू अशीच प्राजक्तासम
उत्कंठा शिगेला न्यावी
अंजलीत भरता तुजला
कणा कणास भरती यावी

१०/०३/२३,
२२:२४

**(९३)**

**वेलीजवळी वेल**

रूप गोजिरे
फुला लाजवीत
वेलीजवळी वेल

नाजूक सौंदर्याची
खनी ही
गोड हास्य फुलवेल

उघड्या डोळ्यांनी
तिज पाहता
मनामधे शिरते

नयना मिटुनी घेता
अलौकिक रूप
तिचेच दिसते

अशी मोहिनी
टाकतसे ती
स्मित हास्य करूनी

रूप मनोहर
कधी ना विसरते
सदैव तिज स्मरूनी

अशी कामिनी
प्रत्येक मनी
विराजीत असते

तिची तोड मग
कोणालाही
कधी येत नसते

तिचा चेहरा
गर्दीमधुनी
खुणावत राहतो

जिच्या तिच्यात मी
आता नेहमी
तिलाच नित पाहतो

तिच्या हास्याचा
सडा प्राजक्ती
मज हृदय अंगणी पडो

नाही भेटली
नजरभेट तरी
वारंवार घडो

दि.२९/६/१९
रात्री: ८.४४ वा

## (९५)
## मौनवस्त्र

जेव्हा हसतेस तू
मोकळे रम्यसे
संपतो अंधार हा
दिसतसे कवडसे

मी काळजीत बुडता
चिंतेत असा गढता
जणू मार्ग दावणारे
स्मित हास्य देशी मला

गर्दीत मी एकटा
वारा विराण होता
डोळे मिटून घेता
तव हास्यमधुर चेहरा

दूरदेशी भटकताना
जग नूतन पाहताना
मी स्मरतो कुंदकळ्यांना
हास्यातून सांडताना

बसता जरा निवांत
नदीकाठ ही शांत शांत
तू जळात हसतेस तेथे
मन माझे गं विश्रांत

मी जगतो म्हणजे काय
तव हास्य हाच उपाय
औषध तुझे हे हसणे
अन मनात हळूच बसणे

तू गाली अशी हसावीस
भेटाया मी कासावीस
हास्याचे चुंबन घेता
मौनवस्त्र नेसावीस

दि.४/७/१९
सकाळी ७.२७ वा.

## (९६)
## **भेटतेस मला अशी**

भेटतेस मला अशी
ऋतू लेऊन जराशी
तऱ्हा तशा वेगळ्या
स्पर्शातून पाकळ्या

कधी शरदाचे चांदणे
मला ओठात ते गोंदणे
जरा शीतल वाऱ्यातून
मला येऊन बिलगणे

हेमंताची गंमत भारी
थंडी वाटे अशी कहारी
स्वत:च येतेस जवळी माझ्या
प्रेमाची ऊब लुटण्या सारी

तेवढ्यात येतो शिशिर भकास
तुझा दुरावा, गळते आस
निष्पर्ण झाड अन् मीही उदास
कटता कटेना युगुल मास

धिरास मिळतो कोंब नवा
वसंतातला प्रणय हवा
अंगोपांगी फुलून येता
शृंगाराचा बहर पहावा

असह्य उष्मा ग्रीष्माचा
क्षण मलाही तू अव्हेरण्याचा
घर्मबिंदूनी कोमेजलेला
तप्त चेहरा पाहण्याचा

अशी येते वर्षा, लेऊन हर्षा
अधीर मी तव ओल्या स्पर्शा
सरीतून बेभान बरसतेस
नभी वर्षा की कवेत माझ्या

सहा ऋतूंच्या अदा सहा
मनमुराद ओथंबून नहा
तव तनामनाचे अलंकार ऋतू
गन्ध वेगळे मनी मरवा

दि.४/७/१९
सकाळी ८.२० वा.

## (९६)
## रुणुझुणु पैंजण नाद मनी

रुणुझुणु पैंजण नाद मनी
सखे साजणी ये जीवनी

किती कोमल तो नाद सुरेल
किणकिण खेचून मना हरेल
राधा भेटते हरीस वनी
रुणुझुणु पैंजण नाद मनी
सखे साजणी ये जीवनी....

नादासवे तव सुखागमन
वावर घरभर गंध पवन
तुझा होई मी सारे विसरूनी
रुणुझुणु पैंजण नाद मनी
सखे साजणी ये जीवनी

चाहूल ती तव येण्याची
संगे मला तू नेण्याची
स्वप्नं पाहतो जागेपणी
रुणुझुणु पैंजण नाद मनी
सखे साजणी ये जीवनी

नाजूक पदतल मुखर घुंगरू
सांग भावना कशा आवरू
गगना भेटते जशी अवनी
रुणुझुणु पैंजण नाद मनी
सखे साजणी ये जीवनी

दि.०५/०४/२१
दुपारी ०१.१३ वा.

## (९७)
## **पाऊसवेडी तूही**

चल ना सोबती झेलू पाऊस
खुल्या आकाशातूनी
ओले झाले घरही माझे
ओल्या गल्लीमधुनी

मृदगंधाचा दरवळ सुटता
आसमंत वेडावे
आज मनाला मन सखे तू
अलगद बघ जोडावे

ओघळणाऱ्या जलधारांच्या
मनात काय हे चाले
कुठून निघाल्या बरसून गेल्या
थेंब थेंब काही बोले

तू का अबोल संगती ऐशी
स्पर्शातून तू बोल
डोळ्यांमधले भाव प्रीतीचे
मजवरती तू खोल

खोलू नको अशी लज्जा छत्री
सोडून भिजशील थोडी
मज प्रीतीच्या वर्षावातून
अमृत बरसे गोडी

कुणी न येथे या रस्त्यावर
पाऊस तू अन् मीही
आज सांगतो गूज मनातील
जाणून घे ना तुही

असे आपुले गावाकडचे
पावसातुनी जाणे
अलगद सहजी आयुष्यातच
तू माझ्या ग येणे

रोज रोजचा पाऊस झेलीन
भिजून मी मनसोक्त
तुझ्या प्रीतीच्या सुखधारांनी
होईन मीही तृप्त

अवचित धरला कर तू माझा
थरथरलो ग मीही
शहारलेला अजूनही मी
पाऊसवेडी तूही

दि.०२/०९/२१
सकाळी ०८.५१ वा.

(९८)

**ही ओढ वेगळी**

असे घडते कसे
निज गेली कुठे
ते शब्द तुझे
मी भाव तिथे

किती वाट पाहणे
असे रेंगाळणे
हवीहवीशी वळणे
घेऊनच बघणे

किती टकटक जागे
मन वेगळे वागे
तू भरशील रंग
मज कानी सांगे

ही ओढ वेगळी
नावीन्ये सगळी
स्वप्नातील गोष्टी
अशी भेट आगळी

कुणी कधी का
येईल स्वप्नी
होईल जे जे
चिंतिले मनी

मी हरखून जाईन
मी निरखून पाहीन
त्या भाषेलाही
मी गिरवून जाईन

दि.१३/०८/२१
मध्यरात्री ०१.०१ वा.

## (९९)
## नजरेत तुझ्या जे आहे

नजरेत तुझ्या जे आहे
मंदिरालयी कोठे नाही
मजला तल्लफ डोळ्यांची
जी कुठेच भेटत नाही

तू सहज पाहतानाही
मज झिंग वेगळी चढते
मी अडकून डोळ्यांमध्ये
वाट स्वप्नातील उलगडते

तू रोखून नजरेला मज
असे एकटक पाहते ना
मी श्वासासही थांबवतो
हा देह मूर्त होते ना

त्या नजरेने घायाळ
हे अंतःकरण बिचारे
तळमळून वेडेपिसे ते
तू दिसशील केव्हा विचारे

मी मिटतो लोचने दोन्ही
तव नेत्रसुखाचे वारे
मी विश्व पाहतो तेथे
तव दृष्टीतून मज सारे

काय नजर पडली तुझी ती
मी स्वतःच बंदी झालो
तू जा म्हटले ना तरीही
मी खेचत जवळी आलो

आता ना कोठे जाणे
मज व्यसनही नाही शराबी
तू नजरेने पाजवते
ती प्रीतशराब गुलाबी

तू मृगनयनी की मीनाक्षी
जादूची मुखावर नक्षी
दिलखेचक शरसंधान
धडधड जोराने वक्षी

हे चंद्र सूर्य तव नयनी
की तारे इश्काचे सारे
मज जीवापाड गं आहेत
तव नयन दोन हे प्यारे

मजवरी सदा तू रोखून
नजरेस अशीच पहा गं
मी शहीद होईन कितीदा
तू संजीवनी सदा गं

दि.३/१/२०२०
रात्री ११.१० वा.

## (१००)
## दर्पणाची काय कथा

दर्पणाची काय कथा
कोणास ठाऊक वेड्या
नजरेतून या अशा घातल्या
रूपवतीने बेड्या

तिने पाहिले असे एकदा
कायमचे तिचेच झालो
रोज पाहते ती स्वत:ला
आरसा का न आम्ही झालो

तिच्या डोळ्यातून ओढ वाहते
ओढून घेण्यासाठी
आरपार ती घुसुनी राहते
कधी न जाण्यासाठी

असे पाहणे कधी न पाहिले
नाते दाखवणारे
पारदर्शी तो होई आरसा
मनदर्पण होता रे

त्या डोळ्यांनी प्राशन केले
अमृत सुधाकराचे
राहील कसला तमही तेथे
मोहिनी तिथे विराजे

झालो आता फिदा असा की
मारो अथवा तारो
या डोळ्यांची घडो संगती
जन्म असावे हजारो

दि.४/१/२०२०
रात्री ११.३७ वा.

# लेखिकेचा परिचय

**नाव – डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी**

**जन्म –**

श्रीमती मृणालिनी आणि श्री. पंढरीनाथ कुलकर्णी यांच्या पोटी तुळजापूर, महाराष्ट्र येथे इ.स. १९७७ साली.

**शिक्षण –**

एम.ए. (संस्कृत) एम. एड., पीएच.डी. (संस्कृत) सेट, नेट प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण. बी.ए.ला संस्कृत विषय घेऊन पुणे विद्यापीठात सर्वप्रथम आणि संस्कृत विशारदला टिळक महाराष्ट्र विद्यापीठात सर्वप्रथम.

**सेवा –**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे संस्कृत विषय घेऊन राज्यात सर्वप्रथम स्थान प्राप्त करीत शासनात राजपत्रित अधिकारी वर्ग–१ म्हणून कार्यरत.

**अध्यापन अनुभव –**

२१ वर्षे, शासकीय महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये सातत्याने अध्यापन.

**प्रशासकीय अनुभव –**

अध्यापनाबरोबरच विविध प्रशासकीय पदेही भूषविली. महाराष्ट्र राज्याच्या सर्वप्रथम पूर्णवेळ महिला भाषा संचालिका; प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग या पदांवर योगदान. सध्या ऑगस्ट २०२२ पासून उपमुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई येथे प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत.

**शोधकार्य –**

अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, संमेलन यातून सहभाग आणि सर्वोत्कृष्ट शोध निबंधांचे पुरस्कार प्राप्त.

विश्व संस्कृत संमेलन, बँकॉक, थायलँड २०१५ यात सहभाग व शोधनिबंध वाचन.

**प्रकाशित ग्रंथसंपदा –**

आजवर ३५ पुस्तके प्रकाशित. त्यात श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, विवेकरत्नानि, वेदकालीन स्त्रीरत्नानि, प्रकाशमार्गाः हे (संस्कृत ग्रंथ) तसेच विवाह-संस्कार, स्मृतिवचनानि, स्मृति-प्रतिपादित-न्याय, प्राचीन भारतीय समाज -भाग १, भाग २, विज्ञानातील संस्कृत, चतुरंग, शोधामृत, संस्कृत - मराठी उखाणे (संस्कृत संबद्ध पुस्तके), जीवन चिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रिया, अणुविज्ञानातील झंझावात डॉ. अनिल काकोडकर, गौरवगाथा सूर्याची (मराठी पुस्तके), मंजुमंजिरी, सर्ग - निसर्ग (मराठी काव्य ऑडियो बुक) प्रकाशित असून सूर्य शक्ती और मानव, कौटिलीय अर्थशास्त्र  भाग १ व भाग २, स्मृतिग्रंथ आणि प्राचीन भारतीय न्यायव्यवस्था ही पाच हिंदी पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**नुकतेच प्रकाशित होत असलेले मराठी ग्रंथ –**

अनमोल विचार ठेवा- नचिकेता (वैचारिक लेखसंग्रह), लावण्यसखी (लावणी संग्रह), कणखर बाणा - राणी अहिल्या (चरित्र), बकुळ फुले (काव्यसंग्रह), मृद्गंध (ग्रामीण काव्यसंग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा (प्रेमपर काव्यसंग्रह), आरस्पानी जीवनगाणी (जीवनपर काव्यसंग्रह), गोड गोड पापा (बालकाव्यसंग्रह), सर्ग - निसर्ग (निसर्गपर काव्यसंग्रह)

**अन्य योगदान –**

व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, साहित्य अकादमी पुरस्कार २0२0 प्राप्त प्रथितयश लेखिका, उच्च शिक्षणातील शैक्षणिक

विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्त्या, सुप्रसिद्ध व्याख्याता, प्रवचनकर्त्या, निवेदिका, अभिवाचक, सूत्रसंचालिका, एकपात्री प्रयोगकर्त्या अशा नानाविध रूपात भाषाकार्य, भाषाविषयक संशोधन, अनुवाद, ब्रीदवाक्य निर्मिती, परिभाषा कोशनिर्मिती, भाषाधोरण निर्मिती अशा भाषाविषयक महत्त्वपूर्ण कार्यात अग्रेसर.

**विश्वविक्रम –**

मराठी काव्यक्षेत्रात जागतिक कीर्तीमान स्थापित. 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' या विश्वविक्रमाची नोंद झालेली आहे. मराठीत काव्य, ललित, चरित्रात्मक, वैचारिक लेखनव्रत निरंतर सुरू.

**साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार – २०२० च्या मानकरी**

'प्रकाशमार्गा:' या डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या मराठी जीवनचरित्राच्या संस्कृत अनुवादासाठी प्राप्त.

**प्रकल्प –**

१) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित वैदिक साहित्याचा इतिहास (२६० पृष्ठे ) या मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प साहित्य अकादमीने प्रदान केलेला आहे. हा प्रकल्प पूर्ण करून साहित्य अकादमीत सादर केलेला आहे.

२) आचार्य बाळाराव सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत आणि हिंदी अनुवाद प्रकल्प स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी प्रदान केला आहे. ते कार्य सुरू आहे.

**विशेष उल्लेखनीय –**

गेल्या २५ वर्षांपासून भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित

अन् कार्यरत आहे. साहित्यिक व्रत म्हणून गेल्या ४ वर्षांपासून रोज काव्यरचना करत असून त्या प्रसारितही करीत आहे.

त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारीजी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

पुरस्कार, सन्मान साहित्यिक, शैक्षणिक, प्रशासकीय, सांस्कृतिक योगदानासाठी – अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

१. परळी भूषण पुरस्कार २०२३
२. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
३. संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. वि.म. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
४. अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
५. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे – साहित्य रत्न पुरस्कार २०२२
६. सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
७. मुन्शी प्रेमचंद सन्मान २०२२
८. अणु विज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर, या ग्रंथास ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
९. महात्मा फुले राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
१०. राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
११. लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार २०१९

१२. संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
१३. राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत वि. द. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
१४. पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई) चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०१७
१५. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी, जि. बीड (महा) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
१६. द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
१७. गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०१६
१८. राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
१९. राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला गौरव पुरस्कार २०१२
२०. राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
२१. दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय नवोदित संस्कृत कवी प्रतियोगिता पुरस्कार २०१२
२२. लोकमत, माझी आई पुरस्कार २०१२
२३. राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
२४. संस्कृत नाट्य महोत्सव संहितालेखन, प्रथम पारितोषिक २०११
२५. संस्कृत नाट्य महोत्सव, द्वितीय पारितोषिक २०११
२६. राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
२७. राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
२८. राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
२९. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, सर्वतृतीय २००१
३०. मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
३१. महाराष्ट्र शासनाचा संस्कृत प्रावीण्य पुरस्कार १९९८

■